MAHA ADVENTURE COUNCIL

Safety & Excellence

# भाग ४

# पाण्यावरील साहसी उपक्रमांसाठी सुरक्षा मार्गदर्शक सूचना

DRAFT

# पाण्यावरील साहसी उपक्रमांसाठी सुरक्षा मार्गदर्शक सूचना

## अनुक्रमणिका


| क्रमांक | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | 'कमीत कमी परिणाम' पद्धती | 3 |
| २. | रिव्हर राफ्टिंग | 4 |
| ३. | कयाकिंग आणि सी कयाकिंग | 10 |
| ४. | स्नॉर्केलिंग | 18 |
| ५. | काइट बोर्डिंग | 24 |
| ६. | रिव्हर क्रूझिंग | 30 |
| ७. | स्कूबा डायव्हिंग | 33 |


(ह्या सूचना तयार करण्यासाठी ATOAIच्या सुरक्षा मार्गदर्शक सूचनांचा आधार घेण्यात आला आहे. या सूचनांचा उपयोग करून संस्थांना पाण्यातील साहसी उपक्रमांसाठी त्यांचे स्वतःची मानक कार्य प्रणाली(S.O.P.) तयार करता येतील.)

DRAFT

# 1. ‘कमीत कमी परिणाम’ पद्धती

‘कमीत कमी परिणाम’ पद्धती वापरल्यामुळे साहसी उपक्रमादरम्यान पर्यावरणावर होणारा अनिष्ट परिणाम कमी होतो. भारतीय संदर्भात पर्यावरण म्हणजे - नैसर्गिक वातावरण, सामाजिक-सांस्कृतिक वातावरण आणि पुरातत्व वारसा इत्यादी. या दस्तऐवजात पुढील गोष्टींची माहिती आहे - (अ) Leave No Trace Seven Principles ही सुप्रसिद्ध मूल्ये आणि (ब) स्थानिक परिस्थितीशी संबंधित शिफारशी

LEAVE NO TRACE SEVEN PRINCIPLES - मूल्ये

भारत आणि महाराष्ट्राच्या संदर्भातील स्थानिक परिस्थितीसाठी लागू असणाऱ्या गोष्टी

१. गुहा, प्राचीन देवस्थाने / पुरातन अवशेष यांना धक्का पोचवू नका किंवा तिथून काही हलवू नका

२. स्थानिक रहिवाशांशी सन्मानाने वागा -

- स्थानिक पाणी आणि अन्नाच्या स्रोतांवर प्रतिकूल परिणाम होऊ देऊ नका (उदा. किल्ल्यावरील पाण्याची टाकी आणि शेती)

- स्थानिक रहिवाशांच्या संस्कृतीवर होणाऱ्या प्रतिकूल परिणामांबद्दल सजग राहा आणि असा परिणाम होऊ देऊ नका

- साहसी उपक्रमांच्या आयोजनातून उभयतांचा फायदा होऊन स्थानिक लोकांना त्यातून रोजगार मिळेल याची काळजी घ्या

- स्थानिकांना तात्पुरत्या स्वरूपाची मदत करायचे टाळा. त्याऐवजी त्यांच्याशी संबंध वाढवा आणि तेथील शाळा, पंचायतींशी संपर्क साधून भरीव मदत करावी

३. साहसी उपक्रमांसाठी तंबू वापरून तात्पुरती निवास व्यवस्था उभारताना स्वयंपाकातील कचरा आणि मलमूत्रामुळे नदी-नाले प्रदूषित होणार नाहीत याची काळजी घ्या

४. हिमालायातील पायवाटांवर स्थानिक भारवाहक प्राणी (खेचर, याक इत्यादी) यांना वाटेच्या वरती सरकून वाट करून द्या.

५. शक्यतो शेकोटी पेटवू नका - परिसरातील वाळलेल्या लाकूडफाट्यावर स्थानिक रहिवाशी आणि निसर्गातील इतर घटक अवलंबून असतात. शक्य असल्यास स्वैपाकासाठी स्टोव्ह वापरा.

DRAFT

# 2. रिव्हर राफ्टिंग

## प्रस्तावना

रिव्हर राफ्टिंग हा जवळजवळ  ३० वर्षे एक लोकप्रिय साहसी उपक्रम म्हणून अस्तित्वात आहे. बराच काळ हा कार्यक्रम फक्त हिमालयातील नद्यांपर्यंत मर्यादित होता (लोकप्रिय स्थळे : ऋषिकेश, मनाली आणि सिक्कीम); कारण या नद्या हिमनदीपासून उगम पावतात आणि त्यामुळे तिथे वर्षभर कधीही राफ्टिंग करता येते.

याउलट भारतातील पठारांवर ज्या नद्यांवर मोठी धरणे आहेत आणि जिथून दिवसातील ठराविक वेळी शेतीसाठी पाणी सोडले जाते अशाच नद्यांवर रिव्हर राफ्टिंग होऊ शकते. पाणी सोडल्यानंतर लगेचच मिळणारा छोटा अवधी रिव्हर राफ्टिंगसाठी वापरला जातो. अशी उदाहरणे म्हणजे दांडेली (कर्नाटक) आणि कुंडलिका (महाराष्ट्र) या नद्यांवरील राफ्टींग.

मुंबई आणि पुण्यासारख्या ठिकाणापासून जवळ असल्यामुळे कुंडलिकासारखी स्थळे अधिक लोकप्रिय होत आहेत. एखाद्याला मुंबईहून एकदिवसीय सहलीत रिव्हर राफ्टिंगचा अनुभव घेणे आता शक्य झाले आहे.

रिव्हर राफ्टिंगसाठी सुरक्षेच्या योग्य पद्धती आवश्यक आहेत.

## नेत्यांसाठी गरजेची माहिती

- साहसी उपक्रमाची उद्दिष्टे
- नेत्यांची नावे व पात्रता, नेते व सहभागी यांचे प्रमाण
- आपत्कालीन परिस्थितीत वापरल्या जाणाऱ्या पर्यायी योजना
- मुख्य नेत्याकडे गरजेची असलेली कागदपत्रे:
  - कायदेशीर कागदपत्रे (नोंदणीपत्र, परवाना इ.)
  - सहभागी व नेत्यांची वैयक्तिक माहिती (वैद्यकीय माहितीसकट)
  - सहभागींकडून घेतलेली हमीपत्रे
  - जिथे उपक्रम आयोजित केला आहे त्या ठिकाणचे जोखीम मूल्यांकन (risk analysis) आणि संभाव्य धोके कमी करण्यासाठीचे नियोजन
  - खालील कागदपत्रांच्या प्रती.
  - अभिप्राय फॉर्म
  - आपत्कालीन प्रतिसाद योजना
  - आपत्कालीन प्रतिसाद पद्धत
  - आपत्कालीन घटना अहवाल
  - औषधाच्या वापराचा अहवाल
  - साधनसामग्रीचा वापर आणि त्यांच्या नुकसानीचा अहवाल

DRAFT

- सेवा दात्यांशी संबंधित माहिती (करारपत्रासहित)

- सहभागी व्यक्तींना वगळण्याचे निकष.
  - मद्य पिऊन आलेली व्यक्ती
  - सुरक्षित पद्धतींचा अवलंब करण्यास नकार देणारी व्यक्ती
  - धोका उत्पन्न होऊ शकतो अशी वैद्यकीय समस्या असलेली व्यक्ती
  - सुरक्षा साधने घालण्यास नकार देणारी व्यक्ती
  - इजा होण्याचा धोका आहे अशी गर्भवती महिला

## नेत्यांची पात्रता

- **औपचारिक प्रशिक्षण**
  - मार्गदर्शकाकडे NIWS किंवा MOT द्वारे मान्यताप्राप्त राष्ट्रीय प्रशासकीय मंडळाकडून योग्यतेचे वैध प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तसेच त्याच्याकडे NIWSकडून मिळालेले लाइफ सेव्हिंग टेक्नीक (LST) प्रमाणपत्र किंवा राष्ट्रीय प्रशासकीय मंडळाचे तत्सम प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
  - मान्यताप्राप्त राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय संस्थेचे कमीत कमी १६ तासांचे (२ दिवस) प्रथमोपचार आणि CPR (Cardio Pulmonary Resuscitation) चे वैध प्रमाणपत्र आणि ऑपरेटरकडून मिळालेले असे प्रमाणपत्र, की "या व्यक्तीस अशा विशिष्ट उपक्रमामध्ये सहाय्य करण्याचा किमान २ वर्षांचा अनुभव आहे आणि ही व्यक्ती गटांना मार्गदर्शन करण्यास आणि बचाव कार्य करण्यास स्वतंत्रपणे सक्षम असावी." सर्व चतुर्थ श्रेणी आणि त्यावरील नद्यांच्या उपक्रमावर काम करणाऱ्या नेत्यांसाठी WRT (White water Rescue Technician) हे प्रमाणपत्र असणे श्रेयस्कर आहे.

- **प्रमाणपत्रे (वैध आहे का हे तपासा)**
  - प्रमुख नेत्याकडे नामांकित संस्थेचे प्रथमोपचार आणि सीपीआर प्रमाणपत्र

- **अनुभव**
  - साहसी उपक्रमांमध्ये गटाचे नेतृत्व करण्याचा अनुभव
  - वैयक्तिक साहसी उपक्रमांचा अनुभव
  - वैद्यकीय आणि अ-वैद्यकीय आपत्कालीन परिस्थिती हाताळण्याचा अनुभव

- **कौशल्ये**
  - लीडरशिप टीमच्या सदस्यांवर देखरेख करण्याची क्षमता
  - उपक्रमाच्या वेळी सुरक्षित वातावरण तयार करण्याचे कौशल्य (सहभागींना काय करावे आणि काय करू नये याच्या सूचना देणे आणि संपूर्ण उपक्रमात सुरक्षेची काळजी घेणे)

DRAFT

- नेतृत्व क्षमता
- आपत्कालीन परिस्थिती हाताळताना जोखीम व्यवस्थापनात 'सुरक्षा प्रथम' असा दृष्टिकोन
- गट व्यवस्थापन कौशल्य
- खंबीरपणे निर्णय घेण्याची क्षमता - विशेषत: धोकादायक परिस्थिती टाळण्यासाठी आणि आपत्कालीन परिस्थिती हाताळताना घ्यायचे निर्णय
- पर्यावरणाच्या सुरक्षिततेसाठी वापरण्यात येणाऱ्या पद्धतींची सखोल माहिती

## साधनसामग्री :

यात पुढील गोष्टी अनिवार्य आहेत : उपक्रमाच्या दरम्यान नेहमी पाण्यावर कमीतकमी दोन नौका असाव्यात. यापैकी दोन्हीही राफ्ट्स/कयाक असू शकतात किंवा एक राफ्ट आणि सेफ्टी कयाक असे असू शकतात.

- **तांत्रिक साधनसामग्री**
  - संस्थेकडे उपक्रमासाठीच्या ठिकाणासाठी लिहिलेल्या मानक कार्यप्रणालीप्रमाणे साधनसामग्री निवडावी. या मानक कार्यप्रणालीमध्ये राफ्ट्स, कयाक्स, पॅडल्स, लाइफ जॅकेट्स आणि हेल्मेट्ससह सर्व साधन सामग्रीची देखभाल, दुरुस्ती आणि त्या वापरातून बाद करणे याबद्दलची माहिती दिली असावी.
  - प्रथमोपचार संच
  - सर्व सहभागी तसेच नेत्यांनी हेल्मेट वापरणे आवश्यक आहे.
  - सर्व राफ्ट्समध्ये संपूर्ण राफ्टभोवती सुरक्षा दोर असला पाहिजे. (याशिवाय बो-लाइन आणि स्टेम लाईन असणेदेखील श्रेयस्कर आहे.)
  - पंप आणि राफ्टदुरुस्तीचा संच, थ्रोबॅग, साठलेले पाणी बाहेर काढण्यासाठी बादली
  - योग्य पादत्राणे–शक्यतो सॅन्डल किंवा हलक्या वजनाचे बूट वापरावेत. कोणालाही अनवाणी येण्याची परवानगी देऊ नये.
  - योग्य कपडे – कोणतेही सैल किंवा ढगळ कपडे, दागदागिने किंवा इतर वस्तू वापरू नयेत.
  - महत्त्वाचे संपर्क क्रमांक अंतर्भूत असलेला एक भ्रमण ध्वनी (सेल फोन)
  - वॉकी-टॉकी संच

### नेत्यांनी उपक्रमापूर्वी काय करावे?

- सहभागी व्यक्तींच्या वैद्यकीय पार्श्वभूमीचा आढावा घ्यावा. यामध्ये प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक अशा दोन्हींसाठी आवश्यक बाबी जागच्या जागी आहेत का ते पाहणे (उदा. औषधांचे दोन संच माहीत असलेल्या ठिकाणी असणे)

- उपक्रम सुरु होण्यापूर्वी राफ्ट आणि इतर साधनसामग्री सुस्थितीत आहे ना हे तपासून घ्यावे.
- आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास पर्यायी व्यवस्था
- प्रत्येक हंगाम सुरू होण्यापूर्वी आणि व्यावसायिक उपक्रम चालू करण्यापूर्वी योग्य देखरेखीखाली पूर्व चाचण्या घेऊन पहाव्यात.

## सेवादाता

- प्रमुख नेत्याने सेवादात्याशी केलेला करार अभ्यासावा.
- प्रमुख नेत्याने सेवादात्याच्या सर्व कर्मचाऱ्यांची पात्रता आणि त्यांचे अशा प्रकारच्या उपक्रमासाठी गटाचे नेतृत्व करण्याचे कौशल्य तपासावे.
- प्रमुख नेत्याने सेवा दात्याच्या कर्मचाऱ्यांच्या भूमिका व जबाबदाऱ्या याचा आढावा घ्यावा.
- या उपक्रमाच्या सुरक्षा मार्गदर्शक सूचना आणि मानक प्रणाली सेवादात्याला पाठवाव्यात आणि उपक्रमादरम्यान त्याची योग्य अंमलबजावणी होत आहे ना हे बघावे.

## सहभागी व्यक्तींसाठी सूचना

- साहसी उपक्रमाची पूर्ण माहिती
- एखाद्याला काही ऐन वेळच्या वैद्यकीय समस्या असल्या तर नेत्याने उपक्रम सुरू होण्यापूर्वी त्या माहिती करून घेणे आवश्यक आहे.
- सांगितलेल्या सूचनांचे पालन न केल्यास उपक्रमात उद्भवणारे धोके आणि त्याचे परिणाम याविषयी नेत्याने सगळ्या गटाला स्पष्ट सूचना द्याव्यात.
- स्वत:ची तसेच इतरांची सुरक्षितता ही प्रत्येकाची जबाबदारी आहे हे सांगावे.

खालील गोष्टींचे आवर्जून पालन करावे.

- नेत्यांसाठी- अनुकरणीय वर्तणूक, पर्यावरण सुरक्षित राहील अशा पद्धती
- सहभागींसाठी- सर्व सूचनांचे पालन करावे.
- जोखीम कमी करण्यासाठी खबरदारी
  - प्रत्येक सहभागीची वैयक्तिक सुरक्षेची साधने ( हेल्मेट, लाइफ जॅकेट किंवा वैयक्तिक फ्लोटेशन डिवाईस), तसेच गटासाठीची साधनसामग्री (राफ्ट्स किंवा पेडल्स) बरोबर आहेत का हे दोन-दोनदा तपासावे.
  - आपत्कालीन परिस्थितीमधील बचावाची योजना तयार असावी.
  - नेत्याचे पूर्ण वेळ गटाकडे लक्ष असावे.
- आवश्यक असल्यास सहभागींचे प्रशिक्षण- उदा. पेडल्सचा वापर, सर्फिंगमधील शरीराची स्थिती, राफ्टिंगच्या आज्ञा इ. जर राफ्टिंगच्या कार्यक्रमात रात्रीचा मुक्काम करायचा असेल तर, प्रशिक्षणामध्ये स्लीपिंग बॅगचा वापर, तंबू लावण्याची पद्धत यासारख्या गोष्टींचा समावेश करावा.

- 'अल्कोहोल, तंबाखू आणि मादक द्रव्य यांच्या सेवनास परवानगी नाही': संपूर्ण गटातील प्रत्येकजण याचे काटेकोरपणे पालन करत आहे याची नेत्याने खात्री करावी.
- सुरक्षितता धोक्यात येईल अशा वेळी उपक्रम थांबवण्याचा अधिकार नेत्याकडे असेल. (उदा. नैसर्गिक घटक, साधनसामग्रीला होणारी हानी, सहभागी व्यक्तींचे असहकार्य).
- पर्यावरणावर कमीत कमी परिणाम होईल असे बघावे.
- भोवतालच्या मंदिरासारख्या सांस्कृतिक संरचनेचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी.
- कार्यक्रमादरम्यान तसेच आपत्कालीन परिस्थितीत काय करावे, आणि काय करू नये.
- नेत्याने गटाला याविषयी माहिती द्यावी.
- आपत्कालीन परिस्थितीत प्रत्येकाकडून काय अपेक्षा आहेत हे नेत्याने स्पष्ट करावे.

## उपक्रमासंबंधीच्या सूचना

- सर्व सहभागी आणि नेत्यांनी पाण्यात असताना संपूर्ण वेळ लाई केट घालणे आवश्यक आहे. लाई केट मध्ये तरंगण्याची पुरेशी क्षमता असणे आवश्यक आहे (किमान ६.१४ किलो. परंतु शक्यतो ९ ते १० किलो.) तसेच यूएस कोस्टगार्ड प्रकार III किंवा IVचे निकष पूर्ण करणे गरजेचे आहे. फुगवण्याची जॅकेट्स किंवा 'कीहोल' प्रकारची जॅकेट्स वापरू नयेत.
- हेल्मेट अनिवार्य आहे (कार्बनफायबर किंवा प्लास्टिकसारख्या मजबूत साहित्यापासून बनवलेले असावे, कपाळ आणि डोक्याच्या मागच्या बाजूला संरक्षण प्रदान करणारे आणि आघात शोषून घेण्यासाठी एक चांगली यंत्रणा असलेले असावे. (अशा हेल्मेट्ला EN 1385 स्टँडर्ड आवश्यक आहे).
- राफ्टिंग सुरू होण्यापूर्वी नेत्यांनी हे तपासून बघितले पाहिजे की प्रत्येकाने लाई केट व्यवस्थित घातले आहे. (खूप सैल नको आणि खूप घट्ट पण नको)
- राफ्टिंग वेगवान प्रवाहातले असो की साध्या प्रवाहातले असो,राफ्टिंग करताना हेल्मेट वापरणे अनिवार्य आहे. त्याचे पट्टे योग्य पद्धतीने बांधले असले पाहिजेत.
- पोहू न शकणाऱ्या सहभागींना ग्रेड ३ च्या वरील रॅपिड्सवर परवानगी नसावी.
- नेत्याने प्रत्येक राफ्टिंग ट्रिपच्या आधी सहभागींना सुरक्षेच्या तपशिलांसह संपूर्ण माहिती द्यावी. सहभागी योग्य पोशाखात आहेत की नाही याची नेत्याने खात्री करावी (अवजड कपडे, साड्या, पगडी, नेक टाय, लांब स्कर्ट आणि थ्री पीस सूट पूर्णपणे टाळावेत)
- कोणत्याही गंभीर आजाराने ग्रस्त असलेल्या, कमजोर हृदयाच्या किंवा अपस्माराचे झटके येणाऱ्या लोकांना आणि गर्भवती मातांना राफ्टवर परवानगी देऊ नये.
- पोहू न शकणाऱ्या सहभागींना बॉडी सर्फिंग करण्याची परवानगी देऊ नये.
- राफ्टिंग सूर्यास्ताच्या किमान एक तास आधी संपेल अशा प्रकारे नियोजन करावे.
- या मोहिमेच्या किमान सहा तास अगोदर ज्याने मद्य (कोणत्याही स्वरूपात किंवा प्रमाणात) किंवा अमली पदार्थांचे सेवन केले असेल, त्याला राफ्टिंग करण्याची परवानगी देऊ नये.

- नदी/ किनारा स्वच्छ ठेवावा.
- स्थानिक लोकांना त्रास होईल किंवा त्या परिसरातील वनस्पती आणि प्राण्यांना हानी पोहोचेल असे काही करू नये.
- सर्व नेत्यांनी आणि उपनेत्यांनी एक नोंदवही ठेवणे अनिवार्य आहे. यात प्रत्येक राफ्टिंगच्या फेरीचा तपशील असणे आवश्यक आहे. उदा. सहभागींची संख्या, नदीचा नकाशा, नदीचा भूगोल- उतार, रॅपिड्स आणि त्यांची उंची , पाण्याची पातळी, वेग – राफ्टवरची उपकरणे, अपघात किंवा अनुचित घटना इत्यादी. प्रत्येक मोहिमेनंतर मोहीमेच्या नेत्याने प्रत्येक नोंदवही तपासून त्यावर स्वाक्षरी करावी.

## उपक्रमाची समाप्ती

- सर्व साधनसामग्री आणि संच हे व्यवस्थित तपासून त्यांची त्यांच्या निकषाप्रमाणे बांधाबांध केली आहे ना याची खात्री करा. टेपच्या किंवा दोराच्या गाठी मारल्या असतील, तर उपक्रम संपल्यावर तिथेच त्या सोडवून घ्याव्यात आणि मगच त्यांची बांधाबांध करावी.
- ज्या साधनांना दुरुस्तीची आवश्यकता आहे किंवा टाकून द्यायची आहेत, ती स्वतंत्रपणे ठेवा. त्या प्रत्येक साधनाबरोबर काय नुकसान झाले आहे याची चिठ्ठी जोडा.
- थ्रो बॅग्स, दोर किंवा लाइफ जॅकेट्स जर ओले झाले असतील, तर ते बांधून ठेवू नका.
- आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करा.
- सहभागी व्यक्ती आणि नेते यांचा अहवाल आणि अभिप्राय घ्यावा.
- कुठलाही तोंडी अभिप्राय असेल, तर तो संस्थेच्या कार्यालयात कळवा.

DRAFT

# ३. कयाकिंग आणि सी कयाकिंग

## परिचय

कयाकिंग हा जागतिक पातळीवरील सर्वांत लोकप्रिय वॉटर स्पोर्ट उपक्रमांपैकी एक आहे. कयाकिंग हे रॅपिड्समध्ये, संथ पाण्यात, सरोवरांमध्ये किंवा समुद्रात करणे हा एक रोमांचक अनुभव आहे, ज्यासाठी कौशल्य आणि स्टॅमिनाची आवश्यकता असते. कयाकला सहसा दोन ब्लेड्स असलेले वल्हे असते आणि बंदिस्त कॉकपिटसारख्या जागेत बसलेल्या पॅडलर्सकडून ते वल्हवले जाते. कॉकपिटमध्ये पाणी कमी यावे यासाठी, पॅडलर्सना अधिक चांगले संरक्षण देण्यासाठी आणि थंड पाण्याच्या नद्यांवर हायपोथर्मियाची(अति थंडीने शरीराचे तापमान कमी होणे) शक्यता कमी करण्यासाठी स्प्रे डेकचा वापर केला जातो. स्प्रे डेकच्या सुरक्षित वापरासाठी प्रशिक्षणाची गरज असते.

सर्व कयाकसाठी बचाव प्रक्रियेचे प्रशिक्षण आवश्यक आहे आणि वातावरणानुसार, कयाकिंगच्या प्रकारानुसार तंत्रे वेगवेगळी असतात.

हा गतिमान खेळ असल्याने प्रशिक्षक आणि मार्गदर्शक अत्यंत अनुभवी असले पाहिजेत आणि वापरली जाणारी उपकरणे सर्वोच्च दर्जाची असली पाहिजेत.

कयाकचे अनेक प्रकार आहेत.

अ) मनोरंजनात्मक कयाक : लहान (एका व्यक्तीसाठी, लांबी सुमारे ३ मी.) आणि रुंद, मोठे, उघडे कॉकपिट. ते फक्त तलाव वगैरेसारख्या संथ पाण्याला अनुकूल असतात.

ब) टूरींग कयाक : साडेतीन ते साडेचार मीटर लांबीचे, सहसा बल्कहेड्स आणि हॅचेस असतात. ते खाडी आणि खाडीसारख्या उघड्या पाण्यासाठी अनुकूल असतात पण मोकळ्या समुद्रासाठी नसतात.

क) समुद्री कयाक : 4.5 ते 6 मीटर लांबी, ह्याला बल्कहेड्स आणि हॅचेस असतात, हातमुक्त पंप यंत्रणा आणि इतर उपकरणे असतात. हे जास्त करुन खुल्या समुद्रात वापरतात.

ड) व्हाईट वॉटर कयाक : व्हाईटवॉटर कयाकचे अनेक प्रकार आहेत, प्रामुख्याने रिव्हर रनर, क्रीक आणि फ्रीस्टाइल - हे सर्व स्प्रेडेकसह असतात.

ई) सिट ऑन टॉप (S O T) : मनोरंजनात्मक पॅडलर्समध्ये S. O. T. कयाक हा एक लोकप्रिय पर्याय आहे. हा कयाक उलटा झाल्यास सरळ करणे सोपे जाते. दुसरीकडे पाहता, पॅडलर्स हे इतर बाहेरील गोष्टींच्या अधिक संपर्कात येतात आणि सनबर्न आणि हायपोथर्मिया इ. होऊ नये ह्यासाठी अधिक काळजी घेण्याची गरज असते. खराब किंवा सैल फिटिंग्ज आणि हॅच कव्हर्स इत्यादी मुळे नुकसान झाल्यामुळे पाण्याचा S. O. T. मधे प्रवेश होऊ शकतो आणि अशा वेळेस असे क्राफ्ट तरंगत नाहीत, तर ते बुडतात.

DRAFT

i) मनोरंजनात्मक प्रकारात सिंगल आणि डबल, अगदी लहान आणि रुंद असे कयाक असतात. ह्या कयाकला पॅडल करताना वाऱ्यामुळे त्रास होऊ शकत असल्याने ते केवळ संथ पाण्याला अनुकूल असतात.

ii) टूरिंग S. O. T. लांब असतात आणि बे एरियाच्या परिस्थितीचा सामना करण्यास सक्षम असतात. कयाक वापरुन मच्छिमारी करणाऱ्या समुदायाकडून त्यांना पसंती दिली जाते.

iii) सी गोइंग S. O. T. मध्ये समुद्री कयाकसारखी कामगिरी आणि वैशिष्ट्ये आहेत. पण ह्या प्रकारच्या कयाकला बंदिस्त कॉकपिट असे डिझाईन नसते.

iv) व्हाईटवॉटर आणि सर्फ वापरासाठी अद्ययावत S. O. T. उपलब्ध आहेत. ओपन वॉटर्समधे, कयाक उलटल्यास, सेल्फ अँकर क्राफ्ट आणि पॅडलर वेगळे होण्यापासून रोखू शकतात. परंतू सेल्फ अँकर मुळे S. O. T. खाली अडकण्याचा धोका असतो.

फ) इन्फ्लेटेबल कयाक : ह्या प्रकारचे कयाक आकारानी खेळण्यांपेक्षा जरा मोठ्या आकारापासून पासुन ते खळाळत्या पाण्यात वापरण्यासाठीचे कयाक इतके पर्याय उपलब्ध आहेत.

## मार्गदर्शक - (Guides / Instructors)

अ) वॉटर स्पोर्ट उपक्रमांसाठी प्रमुख प्रशिक्षकांना कमीत कमी खालील गोष्टी येत असल्या पाहिजेत.

i) सीपीआरसह (Cardio pulmonary Resuscitation) प्रथमोपचार प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र मान्यताप्राप्त प्रदात्याने दिलेले असावे आणि हे प्रशिक्षण किमान 16 तासाचे (2 दिवस) असावे.

ii) विशिष्ट कयाकिंग उपक्रमासाठी मान्यताप्राप्त राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय संस्था आणि ऑपरेटरकडून प्रमाणपत्र आहे की त्या "व्यक्तीला विशिष्ट उपक्रमात मदत करण्याचा 2 वर्षांचा अनुभव आहे, आणि बचाव कार्य करणाऱ्या गटांना मार्गदर्शन करण्यास स्वतंत्रपणे सक्षम आहे.

iii) कयाकिंग अनुभवाच्या प्रमाणित नोंदी असलेले लॉगबुक असावे.

ब) सोबत असलेल्या इतर मार्गदर्शकांकडे, बचाव कार्य, जीवन रक्षक तंत्र ह्याचा अनुभव असावा आणि प्रथमोपचार/CPR ह्याचे प्रमाणपत्र मान्यताप्राप्त प्रदात्याने दिलेले असावे.

क) सर्व प्रशिक्षक आणि मार्गदर्शकांकडे खालील गोष्टी करण्याची क्षमता असली पाहिजे आणि उपक्रमाआधी आणि उपक्रमादरम्यान हे केले आहे याची खात्री केली पाहिजे.

i) उपक्रम सुरु करण्यापूर्वी स्पष्टपणे संवाद साधण्याची आणि सर्वसमावेशक सुरक्षा माहिती देण्याची क्षमता अनिवार्य आहे.

ii) कयाकिंग उपक्रमात सहभागी होण्याची क्षमता आणि कयाकिंगसाठी निवडलेली विशिष्ट जागा ह्याचा अंदाज असला पाहिजे.

iii) सहभागींना संबंधित वैद्यकीय इतिहास विचारा.

iv) पर्यावरणीय परिस्थिती तपासा (हवामान, नदीची पातळी इत्यादी.)

v) धोके ओळखावेत आणि त्याचे मूल्यमापन करून ते एकतर नष्ट केले जावेत किंवा कमीत कमी हानी होईल ह्याची खात्री करण्यासाठी पद्धतशीर धोका व्यवस्थापनाप्रमाणे तपासणी करावी.

vi) उपक्रमाआधी, दरम्यान आणि शेवटी सर्व सहभागींची मोजणी.
vii) सहभागींच्या शारीरिक किंवा मानसिक स्थितीत बदल ओळखण्यासाठी सतर्क राहा.
viii) गटासाठी योग्य गती निश्चित करा आणि आवश्यकतेनुसार विश्रांती घ्या.

## साधनसामग्री

अ) कयाक (एक चांगल्या दर्जाचे असले पाहिजेत, सर्व अडचणींशी सामना करू शकले पाहिजेत. कयाक उलटल्यास कयाकमधून सहज बाहेर पडता आले पाहिजे, पाय अडकू देऊ नयेत, बुडू नयेत आणि अश्या उपक्रमासाठीसाठी योग्य असावेत).

ब) पॅडल्स (कयाकच्या प्रकारासाठी योग्य, सहभागींना वापरायला सोपे, खडकांवर आघातासारख्या या उपक्रमाशी संबंधित सर्व परिस्थितींचा सामना करण्यायोग्य़, दणकट असावेत).

१) नदीवर होणाऱ्या सर्व कयाकिंग उपक्रमांसाठी हेल्मेट अनिवार्य आहे (कार्बन फायबर किंवा प्लॅस्टिकसारख्या मजबूत साहित्यापासून बनवलेले असावे, कपाळ आणि डोक्याच्या मागच्या बाजूला संरक्षण प्रदान करणारे आणि आघात शोषून घेण्यासाठी एक चांगली यंत्रणा असलेले असावे. अश्या हेल्मेट्ला EN 1385 स्टॅंडर्ड आवश्यक आहे).

२) लाइफ जॅकेट्स किंवा पर्सनल फ्लोटिंग डिव्हाइसेस (PFD) नियोजित उपक्रमासाठी योग्य असले पाहिजे, बीआयएस (ब्युरो ऑफ इंडियन स्टॅंडर्ड), अमेरिकी तटरक्षक दल, ब्रिटिश कनोइंग युनियन इत्यादी) प्रमाणित / मंजूर केलेले असावे.

३) थ्रोएबल रेस्क्यू डिव्हाइसेस ताबडतोब वापरासाठी उपलब्ध असणे आवश्यक आहे.

४) बचावकार्य करण्यासाठी वापरायचे कयाक उपक्रमाच्या जवळच (नजरेच्या टप्प्यात) ते / चालवण्यासाठी पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांसह उपलब्ध असणे आवश्यक आहे.

५) थंड हवामानातील उपक्रमादरम्यान  वेटसूट आणि स्प्रे जॅकेट्सची शिफारस केली जाते.

६) प्रशिक्षकाने सर्वांच्या सोबत रेस्क्यू बॅग्ज, चाकू  आणि शिट्ट्या बाळगणे आवश्यक आहे.

7) प्रत्येक उपक्रमाच्यावेळी सोबत प्रथमोपचार संच असणे आवश्यक आहे.

## प्रत्यक्ष आयोजन (Operations)

कयाकिंगच्या सर्व उपक्रमांची सुरुवात संपूर्ण सुरक्षा विषयक माहिती देऊन झाली  पाहिजे. ही माहिती देताना वापरली जाणारी उपकरणे, काय करावे आणि काय करू नये, बचाव आणि आपत्कालीन प्रसंगी काय करावे, उपक्रमासाठीच्या परिसराची सीमारेषा या गोष्टी स्पष्ट करणे आवश्यक आहे. प्रत्यक्ष उपक्रम सुरु होण्यापूर्वी संबंधित जोखीम स्पष्टपणे अधोरेखित करणाऱ्या लाएबिलीटी व्हेवर फॉर्मवर सर्व सहभागींनी स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. कोणतीही वैद्यकीय / शारिरीक समस्या असलेल्या सहभागींना उपक्रमात सहभागी होण्याची परवानगी देऊ नये.

# जोखीम निवारण

१) लाइफ जॅकेट्स : पाण्यावर असायच्या संपूर्ण वेळेत लाईफ जॅकेट घातल्याशिवाय कयाकिंगची कोणतीही क्रिया करू नये. लाइफ जॅकेटमध्ये पुरेशी तरंगण्याची क्षमता असणे आवश्यक आहे, वॉटर स्पोर्ट्स उपक्रम सुरू करण्यापूर्वी प्रशिक्षकाने लाईफ जॅकेट योग्य प्रकारे बांधले पाहिजे आणि तपासले पाहिजे. लाईफ जॅकेट नियोजित वापरकर्त्यासाठी योग्य आकाराचे असले पाहिजे.

२) मार्गदर्शक : प्रशिक्षित मार्गदर्शकच्या उपस्थितीशिवाय कयाकिंगचा कोणताही उपक्रम राबवता कामा नये.

३) व्हाईट वॅाटर कयाकिंगमध्ये फक्त सक्षम जलतरणपटूंनीच सहभागी व्हावे..

४) हेल्मेट : व्हाईट वॅाटर कयाकिंगसाठी हेल्मेट अनिवार्य आहे. हेल्मेट चांगले फिट, घट्ट असले पाहिजे.

५) प्रशिक्षक आणि सहभागी यांचे प्रमाण : खेळाच्या तांत्रिक स्वरूपामुळे कंपनीने व्हाईट वॉटर कयाकिंगमध्ये सहभागी - प्रशिक्षक प्रमाण नेहमी 1:4 आहे याची खात्री करावी आणि नेहमी किमान दोन पात्र प्रशिक्षक असले पाहिजेत.

६) कयाकांची संख्या : किमान तीन कयाक असले पाहिजेत, एकाच कयाकला परवानगी नाही.

७) मद्यपान: उपक्रमाच्या किमान सहा तास आधी मद्यपानावर सक्त बंदी आहे.

८) सहभागींची क्षमता : सहभागीची क्षमता एखाद्या भागात कमी पडेल असे प्रशिक्षकाला वाटल्यास त्या ठिकाणी सहभागीला नेऊ नये. सहभागींच्या शारिरीक क्षमतेचे मूल्यमापन करून त्यांना योग्य त्या भागात न्यावे.

९) सूचना फलक: पाणी/नदीच्या किनारी असलेल्या कँप साईट्स/ऑपरेटर्सनी फलक लावले असले पाहिजेत, ज्यात देखरेख केल्याशिवाय उपक्रम राबवला जाणार नाही असे स्पष्टपणे नमूद केलेले असावे.

१०) कयाकिंग उपक्रम अंधारात करू नये आणि अंधार पडायच्या किमान एक तास आधी उपक्रम संपवावा.

११) वयोमर्यादा:

i) 12 वर्षांखालील मुलांना वेगाने वाहणाऱ्या नदीत / पाण्यात कयाकिंगला परवानगी देऊ नये.

ii) 12 वर्षांवरील मुले फक्त ग्रेड 2च्या रॅपीड्स मधे कयाकींग करू शकतात

iii) 14 वर्षांवरील मुले ग्रेड 3च्या रॅपीड्स मधे कयाकींग करू शकतात.

iv) तलावांमध्ये मनोरंजनात्मक कयाकिंग आणि कॅनोइंगसाठी वयोमर्यादा १० वर्षे आहे. किनाऱ्यापासून (जास्तीत जास्त ५० मीटर) दूर न जाता आणि केवळ चांगल्या हवामानात कयाकिंग आणि कॅनोइंग केले जाणे आवश्यक आहे.

## मानक कार्य प्रणाली (S.O.P) आणि प्रत्यक्ष कृतीसाठी सूचना

अ) सर्व कयाकिंग ऑपरेटर्सनी त्यांच्या ऑपरेशन्ससाठी मानक कार्य प्रणाली (S.O.P) तयार करणे आवश्यक आहे.

ब) उपक्रमाच्या आयोजनात एजन्सीने स्वीकारलेल्या पद्धतींचा समावेश करण्याव्यतिरिक्त, सहभागींच्या वैद्यकीय स्थितीचे मूल्यमापन करणे आणि उपक्रमाच्या आयोजनाची पद्धत, दुखापत टाळणे, सुरक्षेची खबरदारी, दळणवळण, हवामान, अपघात आणि गंभीर घटना, अभिप्राय देण्याची पद्धत  इयादीचा उल्लेख एस. ऑ. पी. मधे असणे गरजेचे आहे.

i) बचाव, स्थलांतर आणि वैद्यकीय मदत यासह आपत्कालीन कृती आराखडा तयार असणे आवश्यक आहे. कर्मचारी/ मार्गदर्शक/ चालकांना आपत्कालीन कृती आराखड्याच्या सर्व पैलूंचे वेळोवेळी प्रशिक्षण दिले पाहिजे.

ii) जाहिरातींमधून  उपक्रमा संबंधित जोखीम आणि धोके यांचे खरे चित्र देणे सहभागींना देणे आवश्यक आहे. बहुदिवसीय कयाकिंग मोहिमेसाठी गाईड्स आणि त्यांच्या अनुभवाची माहिती ग्राहकांना पाठवली पाहिजे.

## दस्तऐवजीकरण

उपक्रमाच्या वेळी आयोजकाकडे  किमान खालील कागदपत्रे असावीत :

अ) सर्व मार्गदर्शक आणि प्रशिक्षकांचा तपशील, प्रमाणपत्रांच्या प्रती, अनुभवाची नोंद आणि ग्राहकांकडून आलेला अभिप्राय.

ब) ऑपरेशन्ससाठी आवश्यक असलेल्या सर्व परवानग्यांच्या प्रती.

क) सर्व सहभागी, मार्गदर्शक आणि प्रशिक्षक इत्यादी. चे ओळखपत्र व इतर दस्तऐवज, विमा संरक्षण आणि नातेवाइकांच्या तपशीलाच्या प्रती.

ड) मानक कार्य प्रणालीची (S.O.P) प्रत

ई) आपत्कालीन संपर्क क्रमांकांची ताजी यादी

## आणीबाणीची परिस्थिती आणि सुटका/बचाव:

अ) कयाकिंग उपक्रमादरम्यान पुरेशी प्रथमोपचार, वैद्यकीय उपकरणे उपलब्ध असणे आवश्यक आहे.

ब) आणीबाणी प्रसंगी सुटकेचे/बचावाचे मार्ग सहभागी, मार्गदर्शक आणि प्रशिक्षकांना माहिती असणे आवश्यक आहे.

क) आणीबाणी हाताळण्याची/ सुटका करण्याची पद्धत तपशीलवार आणि लिखित स्वरुपात कयाकिंग करणाऱ्या चमुबरोबर उपलब्ध असली पाहिजे त्यात आणीबाणी काळात संपर्क करावयाच्या सर्वात जवळच्या सेवा केंद्रांची माहिती असली असली पाहिजे.

DRAFT

## सुरक्षेविषयक माहिती:

कयाकिंग सुरक्षित रीत्या कसे करावे याच्याशी संबंधित सर्व माहिती प्रशिक्षक आणि मार्गदर्शकांना देता आली पाहिजे. ही माहिती सुस्पष्ट असावी आणि इंग्रजी, हिंदी किंवा सहभागींना समजू शकेल अशा स्थानिक भाषेत दिली पाहिजे.

## वैद्यकीय समस्या

उपक्रम सुरु होण्यापूर्वी मार्गदर्शक/प्रशिक्षकांनी सहभागींना वैद्यकीय स्थितीबद्दल प्रश्न विचारणे शक्य झाले पाहिजे. हृदयरुग्ण, पाठीच्या कण्याच्या समस्या, नुकतीच शस्त्रक्रिया किंवा चिंतेची इतर कोणतीही वैद्यकीय समस्या, गरोदर महिला आणि नियमा पेक्षा कमी वयाच्या मुलांना या उपक्रमात सहभागी करून घेऊ नये. ज्यांना दम्याचा अथवा फीट येण्याचा त्रास आहे त्यांच्या आजाराच्या तीव्रतेची माहिती करून घ्यावी. दम असलेल्या व्यक्तींनी सोबत इनहेलर नेणे जरुरीचे आहे आणि ते त्यांनी शक्यतो मार्गदर्शकाकडे द्यावे.

## ऑपरेटर्सना मान्यता मिळवण्यासाठीची किमान मानके

मान्यतेसाठी अनुदान मागणाऱ्या कोणत्याही संघटना, संस्था, आस्थापना किंवा कंपनीने या इच्छित निकषांची पूर्तता करावी:

अ) संस्थेकडे असे उपक्रम आयोजित करण्यासाठी गरजेची असलेली खास उपकरणे असणे आवश्यक आहे.

ब) असे उपक्रम आयोजित करण्यासाठी संस्थेकडे पात्र मनुष्यबळ (त्यातील किमान दोन पूर्णवेळ कर्मचारी) असणे आवश्यक आहे. अशा व्यक्तींकडे उपक्रमाचा अपेक्षित अनुभव असणे आवश्यक आहे आणि त्यांच्याकडे सीपीआरसह (Cardio pulmonary Resuscitation) प्रथमोपचाराचे वैध प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

क) संस्थेकडे आवश्यक परवाने/ नोंदण्या असल्या पाहिजेत.

ड) संस्थेच्या कार्यकारी मंडळावर किमान एक पात्र आणि अनुभवी व्यक्ती असली पाहिजे, ई) या संस्थेची राज्य पर्यटन विभागाकडे नोंदणी असणे / भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयाची मान्यता असल्यास श्रेयस्कर असेल.

फ) संस्थेचे नोंदणीकृत कार्यालय असणे आवश्यक आहे.

ग) कयाकिंग कंपनीने 'पर्यावरणावर कमीत परिणाम कसा होईल' (Minimisation Of Environmental Impact) ह्या धोरणाचे कसोशीने पालन करावे.

DRAFT

# समुद्रावरील कयाकिंगसाठी अतिरिक्त मार्गदर्शक तत्त्वे

## परिचय

समुद्रावरील कयाकिंग सहसा खाडी किंवा किनाऱ्याजवळील समुद्रात / बेटांवर, समुद्री कयाक वापरून केले जाते. या कयाकमध्ये सहसा डेक झाकलेले असतात किंवा कमी कालावधीसाठी ते सिट ऑन टॉप (S O T) प्रकारचे असू शकतात. व्हाईट वॉटर कयाकच्या तुलनेत समुद्री कयाकचा वेग जास्त असतो, अधिक कार्गो क्षमता, सरळ रेषेचे पॅडलिंग सुलभ असते आणि हे कयाक लांबच्या प्रवासासाठी आरामदायी असतात. समुद्रातील कयाकिंग काही तासांचे किंवा काही दिवसांच्या सागरी प्रवासांचे पण असु शकते.

## सी कयाकिंगसाठी लागणारी अतिरीक्त साधने:

अ) फ्लोटिंग आणि वॉटरप्रूफ कंपार्टमेंटसाठी दोन्ही टोकांवर बल्कहेड असलेला समुद्री कयाक. जास्तीत जास्त लांबून नजरेत येण्यासाठी फ्लोरोसंट रंगाचे कयाक आणि ॲक्सेसरी इक्विपमेन्ट असल्यास जास्त चांगले.

ब) बिल्ज पंप

क) पॅडल फ्लोट

## इतर आवश्यक साधने (अनेक दिवसाच्या सागरी प्रवासासाठी)

अ) नेव्हिगेशन चार्ट / जीपीएस/ डेक कंपास. ब) पिण्याचे पाणी आणि अन्नासाठी कंटेनर. क) लायटर किंवा वॉटरप्रूफ माचीस ड) सन प्रोटेक्शन क्रीम, सनग्लासेस आणि डोक्यासाठी संरक्षण इ) आपत्कालीन निवारा साधने फ) कोरड्या पिशवीत अतिरिक्त कपडे.

## मार्गदर्शक / नेत्यांसाठी साधनसामग्री :

अ) भरती - ओहोटीचा ताजा अहवाल

ब) जास्तीचे (एक्सट्रा) पॅडल्स

क) टोईंग सिस्टीम

ड) कयाक दुरुस्ती संच/साधने.

इ) संपर्कासाठी व्हीएचएफ रेडिओ किंवा मोबाईल फोन.

फ) अन्न आणि पिण्याचे पाणी

ग) योग्य प्रथमोपचार संच.

## अनेक दिवसीय कयाकिंग उपक्रमासाठी :

### अतिरिक्त सुरक्षाविषयक माहिती आणि चेकलिस्ट :

DRAFT

उपकरणे, हवामान, लाटा, भरती - ओहोटीचा प्रवाह, वारा आणि सर्फिंगची परिस्थिती यांची सहभागींना माहिती आहे याची आयोजकांनी खात्री करून घेणे आवश्यक आहे.

अनेक दिवसाच्या समुद्री कयाकिंग ट्रिप्ससाठी, ऑपरेटरने पर्यटकांकडे खालील क्षमता असल्याची खात्री करणे गरजेचे आहे:
अ) कयाक उलटा झाल्यास, गाईडच्या मदती शिवाय कयाकच्या बाहेर येता येणे आवश्यक आहे
ब) सेल्फ़ आणि असिस्टेड रेस्क्यू करता येणे आवश्यक आहे
क) कयाकचे प्रक्षेपण आणि लँडिंग तंत्र.
ड) व्हीएचएफ रेडिओ कम्युनिकेशन.
इ) विविध आपत्कालीन संकेत उपकरणे/ संकेत समजून घ्या.
ड) गरज पडल्यास दुसऱ्या पॅडलरला टोइंग करता येणे.
ग) नेव्हिगेशन कौशल्य.
ह) मूलभूत शिबिर कौशल्य.

## सी कयाकिंग सहलींदरम्यान इतर जहाजांच्या बाबतीत सतर्क राहण्यासाठी माहिती :

अ) नेहमी आजुबाजूच्या जहाजांवर लक्ष ठेवा.
ब) येणाऱ्या जाहाजाने तुम्हाला पाहिले आहे असे कधीही गृहीत धरू नका.
क) शिपिंग लेन रिकाम्या ठेवा अणि शिपिंग लेन जिथे सर्वात लहान आहे त्या मार्गांनी ती पार करा. शिपिंग लेनच्या मार्गाचे उतारे तपासा.
ड) टक्कर होण्याचा संभव असल्यास लवकर मागे वळा.
इ) मल्टी डे सी कयाकिंग सहलींसाठी ऑपरेटर्सनी चमूसाठी आवश्यक बचाव बॅकअप उपलब्ध असल्याची खात्री करणे आवश्यक आहे. असा बॅकअप सर्व आवश्यक बचाव उपकरणे आणि प्रस्थापित दळणवळण यंत्रणा असलेल्या रेस्क्यू बोट किंवा ग्राउंड सपोर्ट टीमच्या स्वरूपात असू शकतो. आपत्कालीन कृती आराखडा बरोबर असावा आणि अशी परिस्थीती हाताळण्याचे वेळोवेळी प्रशिक्षण झालेले असणे आवश्यक आहे.
फ) सहभागींनी कधीही एकट्याने किंवा मद्य/अवैध अंमली पदार्थांच्या प्रभावाखाली कयाकींग करू नये. लाईफ जॅकेट्स/पीएफडी'(पर्सनल फ्लोटिंग डिव्हाइसेस) कयाकींग साठी अनिवार्य आहे आणि पाण्यावर असायच्या संपूर्ण वेळेत ते व्यवस्थित घालणे आवश्यक आहे.
ग) सी कयाकिंग करण्यात पारंगत असलेले कमीत कमी दोन गाईड्स नेहमी बरोबर असणे आवश्यक आहे. दहापेक्षा जास्त पॅडलर्ससाठी तीन मार्गदर्शका बरोबर असावेत. गाईड्सना भरती - ओहोटीच्या लाटा, प्रवाह आणि वारा/हवामानाची माहिती असावी. सुरक्षेविषयक तपशीलवार माहिती देण्याची क्षमता त्यांच्यात असावी आणि प्रथमोपचार/सीपीआरचे वैध प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

# ४. स्नॉर्केलिंग

## परिचय

स्नॉर्केलिंग दोन प्रकारचे असते: किनारा- स्नॉर्केलिंग आणि बोट स्नॉर्केलिंग. पहिल्या प्रकारात किनाऱ्यावरून आणि दुसऱ्या प्रकारात बोटीतून प्रक्षेपण केले जाते. स्नॉर्केलिंग ही एक जलांतर्गत क्रिया आहे जी लोकांना सागरी जगाशी संवाद साधून देते. योग्य प्रकारे केल्यास स्नॉर्केलिंग आनंददायी, समाधानकारक आणि सुरक्षित असते. तथापि, अंमलबजावणीत गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी जास्त खबरदारी घेणे गरजेचे असते.

व्यावहारिक कारणांसाठी, 'स्नॉर्केलिंग च्या व्याख्येतून स्कूबा डाइव्ह सुरू होण्यापूर्वी किंवा संपल्यानंतर होणारे स्नॉर्केलिंग वगळले जाते. केवळ स्नॉर्केल, मास्क आणि पंखे घालून पाण्याखाली परंतु पाण्याच्या पृष्ठभागालगत पोहणे असा होतो असा याचा अर्थ होतो.

## प्रशिक्षक/सुपरवायझर्स: गरजेची पात्रता आणि अनुभव

१) स्नॉर्केलिंग उपक्रम आयोजित करणाऱ्या प्रत्येक रिसॉर्ट/वॉटर स्पोर्ट्स सेंटरमध्ये किमान एक लाईफ गार्ड असणे गरजेचे आहे.

२) स्नॉर्केलिंग ठरवून दिलेल्या क्षेत्रातच केले पाहिजे

३) स्नॉर्केलिंगसाठी आलेल्या लोकांसोबत नेहमी  प्रशिक्षित आणि परवानाधारक गाईड असायला हवा. सहभागी व्यक्ती पाण्यात असताना ती कधीही एकटी असणार नाही याची काळजी घेणे गरजेचे आहे.

४) किनारा स्नॉर्केलिंग  (किनाऱ्यावरून प्रक्षेपित केल्यास), कोणत्याही प्रसंगाला तोंड देण्यासाठी जवळच  पूर्णपणे सुसज्ज रेस्क्यू बोट अँकर केली असली पाहिजे)

५) जेव्हा बोटीतून स्नॉर्केलिंग केले जाते, तेव्हा सहभागीची देखरेख गाईडकडून केली जाते  याची खात्री करण्याबरोबरच जहाजावरील व्यक्तीही त्याच्यावर सतत लक्ष ठेवून असतात.

६) स्नॉर्केलिंग दरम्यान वापरली जाणारी रेस्क्यू बोट या मार्गदर्शक तत्त्वात दिलेल्या अटींनुसार असली पाहिजे.

७) रेस्क्यू बोटीकडून असलेल्या गरजा पूर्ण करत असेल तर  स्नॉर्केलिंग लाँच करण्यासाठी वापरली जाणारी बोट बचावकार्यासाठीही वापरली जाऊ शकते. ह) खुल्या पाण्याच्या स्नॉर्केलिंग बोटीला प्रत्येकी एक ६० एचपीची किमान क्षमता असलेली दोन इंजिने बसवावीत,. आपत्कालीन परिस्थितीत बोटीला किनाऱ्यावर लवकर पोहोचण्यासाठी पुरेशी ताकद असण्यासाठी  इंजिनची क्षमता अधिक असणे आवश्यक आहे. दोन इंजिने असलेली बोट,  एका इंजिनमध्ये बिघाड झाला तरी लोकांना किनाऱ्यावर सुरक्षितपणे आणण्याइतकी सक्षम असते.

८) ओपन वॉटर स्नॉर्केलिंगसाठी पुढील गोष्टी बोटीबरोबर असणे आवश्यक आहे: परवानाधारक बोट-हँडलर, कमीत कमी दोन प्रमाणित स्नॉर्केलिंग गाईड्स (ते प्रत्यक्ष बोटीवर असलेल्या सहभागींच्या संख्येवर अधिक अवलंबून असते), किमान एक प्रमाणित लाईफ सेव्हर, एक 'लूक आऊट".

९) सुपरवायझर हा अगदी उत्तम (तरबेज) जलतरणपटू असला पाहिजे आणि आपत्कालीन परिस्थितीत पटकन निर्णय घेण्याची क्षमता असलेला आणि प्रथमोपचार/ सी.पी.आर् यांचे प्रशिक्षण असावा.

१०) उपक्रमादरम्यान गाइड तणावपूर्ण स्थितीत नाही ना,याची खात्री करणे आवश्यक आहे आणि साधारण ३० मिनिटाची एक फेरी धरल्यास त्याला एका दिवसात सातपेक्षा जास्त फेऱ्या करायला सांगू नयेत.

## जलक्रीडा केंद्रासाठी गरजेच्या गोष्टी

अ) सर्व केंद्रांची स्थानिक पर्यटन विभागाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे.

ब) सर्व केंद्रांवर आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास वापरण्यासाठी शुद्ध प्राणवायु उपलब्ध असणे गरजेचे आहे. तसेच स्नॉर्केलिंगदरम्यान अपघात झाल्यास काय करावे हे सांगणारा 'आपत्कालीन कृती आराखडा' तयार असावा. आपत्कालीन कृती आराखड्यात खालील गोष्टींचा समावेश असला पाहिजे:

i) बेपत्ता जलतरणपटूंचा शोध घेऊन त्यांची व्यवस्था लावणे .

ii) प्रथमोपचार/सीपीआर पुरवणे.

iii) जवळच्या वैद्यकीय केंद्रात जाण्यासाठी वाहतुकीची व्यवस्था.

iv) योग्य अधिकाऱ्यांना कळवणे. (पोलीस, नौदल, तटरक्षक दल, पर्यटन मंत्रालय इ.)

क) सर्व कर्मचारी या आपत्कालीन कृती आराखड्याशी परिचित असणे आवश्यक आहे आणि योग्य ती कृती करू शकले पाहिजेत.

ड) केंद्रांमधील कर्मचारी आणि ग्राहकांसाठी विमा असणे आवश्यक आहे.

## आवश्यक उपकरणे

### अ) स्नॉर्केलिंग उपकरणे

i) स्नॉर्केलिंग उपक्रम पुरवणाऱ्या प्रत्येक केंद्रात त्याच्या क्षमतेनुसार उपकरणे असली पाहिजेत. यामध्ये या गोष्टींचा समावेश असावा.

१) मुखवटे-प्रिस्क्रिप्शन आणि नॉन-प्रिस्क्रिप्शन दोन्ही.

२) रॅश गार्ड आणि / किंवा ओले सूट.

३) सर्व साइजचे फिन्स्.

४) फिन्स् बरोबर जाणाऱ्या बूटीज.

५) स्नॉर्केल.

६) गरज पडल्यास सिग्नल्सच्या उपकरणांची व्यवस्था असावी.

**ब) स्नॉर्केलिंगसाठी वापरल्या जाणाऱ्या डाइव्हबोटी/बोटी**

i) अशा बोटी ही मध्यवर्ती कार्यालय आणि त्यांतील सदस्य यांची जबाबदारी आहे

ii) प्रत्येक बोटीत किमान २-३ कर्मचारी असणे आवश्यक आहे. पोहणाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी हे करणे आवश्यक आहे. त्यांना कोणतीही गरज पडल्यास मदत करण्यासाठी जलतरणपटूची जादा कुमक बोटीवर असावी. बोटीवर खालील गोष्टी असणे जरुरी आहे:

१) लक्षणीय अनुभव आणि योग्य प्राधिकरणाकडून बोट ड्रायव्हिंग/कॅप्टनचा'परवाना.

२) स्नॉर्केलिंग लोकेशनचे पुरेसे ज्ञान असलेले केंद्र कर्मचारी किंवा बेस लीडरने मंजूर केलेली इतर व्यक्ती.

३) प्रथमोपचार/सीपीआर प्रमाणपत्र.

४) ऑक्सिजन रिसेसिटेशन आणि उपचार प्रमाणपत्र किंवा पॅडी/डॅन ऑक्सिजन प्रोव्हायडर कोर्स.

५)ज्यांना पोहता येत नाही अशांसाठी किंवा आपत्कालीन परिस्थितीसाठी लाइफ जॅकेट्स.

६) सुस्थित असलेला वॉकी-टॉकी, फोन, रेडिओ टेलिफोन किंवा कुठलेही थेट संपर्क साधन वापरून बोटींना नेहमी केंद्राशी संवाद साधता आला पाहिजे.

७) स्नॉर्केल साईटवर जाण्यासाठी आणि येण्यासाठी तसेच काही बदल असल्यास त्यालाही पुरेसे पडेल एवढे इंधन बोटींमध्ये असणे आवश्यक आहे.

८) बोटीत दोन इंजिने असली पाहिजेत किंवा इंजिन मध्ये बिघाड झाल्यास बॅकअप इंजिन असावे.

९) सेंटरने बोटीमधे स्पेअर टॅंक, स्पेअर स्नॉर्केलिंग उपकरणे, प्रथमोपचार, ऑक्सिजन किट, डाइव्ह फ्लॅग आणि पाण्यात सहज उतरता येईल किंवा पाण्यातून बाहेर येत येईल अशी शिडी.

## उपकरणांची देखभाल

अ) उपकरणांचे दरवर्षी सर्विसिंग करणे गरजेचे आहे आणि ती दर पाच वर्षांतून एकदा बदलली पाहिजेत.

ब) प्रत्येक वापरानंतर उपकरणे धुवावीत, वाळवावीत आणि नीट तपासावीत.

मानक कार्य प्रणाली (S.O.P) आणि प्रत्यक्ष कृतीसाठी सूचना

## स्नॉर्केलर्ससाठी किमान पात्रता

**अ) स्नोर्केल करू इच्छिणाऱ्या जलतरणपटूनी खालील कागदपत्र सादर करावीत:**

१) स्नॉर्केलसाठी योग्य (फीट) असल्याचे वैद्याकोय प्रमाणपत्र किंवा स्ना ॅर्केलिंगसाठी करण्यास अपात्र ठरू शकेल अशी एखाद्या व्यक्तीची वैद्यकीय स्थिती असल्यास त्या त्या व्यक्तीने विवक्षित स्थितीत स्नॉर्केलिंग करण्यास तंदुरुस्त असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे.

DRAFT

२) त्या व्यक्तीला पोहतां येते आणि पाण्यामधील हालचालीत सहजता आहे याची हमी, तसे नसल्यास लाइफ जॅकेट घालण्याची तयारी ठेवावी. पोहतां न येणाऱ्या/जुजबी पोहता येणाऱ्या व्यक्तींसाठी लाइफ जॅकेट अनिवार्य आहे व तशी खात्री संबंधित प्रशिक्षकाने प्रशिक्षण सुरूं करण्यापूर्वी करावी.

**ब) स्नॉर्केलिंग उपक्रमांची देखरेख**

i) स्नॉर्केलिंग ट्रिप्सचे नियोजन करणे आवश्यक आहे - ट्रिप प्लॅनमध्ये केलेल्या कोणत्याही बदल केंद्राला कळवणे आवश्यक आहे.

ii) स्नॉर्केलिंग गाईड एकावेळी ०२ पेक्षा जास्त व्यक्तिंची देखभाल करू शकत नाही.

**क) प्रतिबंधित क्षेत्रात स्नॉर्केलिंग**

i) अंदमान आणि निकोबारच्या काही भागांमध्ये लष्कर, नौदल किंवा इतर सरकारी शाखांद्वारे गस्त घातली जाते किंवा नियंत्रण केले जाते .या ठिकाणी स्नॉर्केलिंग करता येत नाही. यासंबंधी मान्यवर संस्थांकडून माहिती घेणे आवश्यक आहे.

**ड) सांस्कृतिक आणि पर्यावरण संरक्षण**

i) समुद्रातून काहीही घेऊ नये आणि विशेषतः सांस्कृतिक स्मारके/ कलाकृती घेऊ नयेत.

ii)) सांस्कृतिक स्मारकांचे नुकसान करणे किंवा त्यातून काहीही काढण्याला बंदी आहे.

iii) स्नॉर्केलर्सनी सागरी पर्यावरणाचे आणि तेथील रहिवाशांचे संरक्षण केले पाहिजे. स्नॉर्केलर्सनी सागरी प्राण्यांना शारीरिक इजा करून त्रास देऊं नये. प्रवाळांचे संरक्षण करावे.शार्क माशांना कोणत्याही परिस्थितीत खायला घालू नये

iv) सागरी संरक्षित क्षेत्रांसाठी (MPAs) आणि संरक्षित प्रजातींना हानी पोचेल असे वर्तन करूं नये. सागरी संरक्षित क्षेत्रांमध्ये(MPAs) पोहण्यासाठी/ स्नॉर्केलला परवाने आवश्यक असू शकतात.ते परवाने पोहण्यापूर्वी मिळवलेले असावेत.

## गरजेची कागदपत्रे

प्रत्येक केंद्र/कार्यालयात समाविष्ट असणाऱ्या प्रत्येक जलतरणपटूची नोंद असणे आवश्यक आहे:

i) पूर्ण नाव आणि संपर्क माहिती.

ii) आपत्कालीन संपर्क माहिती.

iii) त्यांनी केलेल्या उपक्रमांचा तपशील.

iv) वैद्यकीय स्वरूप आणि दायित्व सवलत.

v) ही सर्व माहिती कंपनीने कमीत कमी 5 वर्षे जतन करून ठेवणे आवश्यक आहे.

## जोखीम निवारण

अ) प्रत्येक प्रवासापूर्वी जलतरणपटूंना सविस्तर माहिती दिली पाहिजे. थोडक्यात सुरक्षा नियम,पाण्याची खोली, स्नॉर्केल साइट वैशिष्ट्ये, प्रवाह, प्रवेश आणि बाहेर पडण्याचे तंत्र, पर्यावरणीय विचार आणि संभाव्य धोके यांची माहिती देणे आवश्यक आहे.

ब) स्नॉर्केलिंग करताना फ्लोटेशन डिव्हाइस म्हणून लाइफ जॅकेटचा वापर करणे बंधनकारक आहे.

क) स्वतंत्रपणे स्नॉर्केलिंग करणे, किंवा गाईड वा सुपरवायझरच्या अनुपस्थितीत स्नोर्केल करण्यास परवानगी नाही.

ड)केंद्राला स्थानिक हवामानाची माहिती असणे आवश्यक आहे आणि स्नॉर्केलिंग करण्यापूर्वी प्रत्येक ठिकाणी जलतरणपटूंना विशेष परिस्थितीची माहिती देणे आवश्यक आहे.

इ) खालील परिस्थितीत स्नॉर्केलिंग करण्यास बंदी आहे:

i) खवळलेला समुद्र .

ii) वादळ.

फ) स्नॉर्केलर्सनी त्यांच्या उपस्थितीची स्पष्ट खूण करणे अत्यावश्यक आहे. ज्या बोटीतून स्नोर्केलार्स कार्यरत आहेत त्या बोटीने  इतर बोटींना माहिती देण्यासाठी दिवस-रात्र डिस्प्ले सिग्नल (म्हणजे झेंडे) दाखवणे आवश्यक आहे

ग) डाइव्ह फ्लॅग कुठेही वापरता येतो

जिथे डायव्हर्स किंवा स्नॉर्केलर्स डुबकी मारत असतात तिथे आणि जलतरणपटू पाण्यात असताना बोटींनी ते नेहमी प्रदर्शित केले पाहिजेत.

## आपत्कालीन योजना आणि रेस्क्यू

अ) सर्व केंद्रांकडे आपत्कालीन कृती आराखडा असणे आवश्यक आहे.

ब) केंद्रातील सर्व कर्मचारी आपत्कालीन प्राणवायू उपकरणांशी परिचित असणे आवश्यक आहे आणि सर्व कर्मचाऱ्यांसाठी दरवर्षी प्रशिक्षण सत्रे ठेवणे आवश्यक आहे.

## सुरक्षा माहिती

अ) साइट ब्रिफिंग व्यतिरिक्त, सर्व जलतरणपटूंना सुरक्षेची माहिती मिळाली पाहिजे, बोटीवर आपत्कालीन आणि प्रथमोपचार उपकरणे कोठे उपलब्ध आहेत याची सविस्तर माहिती दिली पाहिजे. बोटीसंबंधी सुरक्षेविषयी माहिती बोटीत चढल्यावर दिली पाहिजे.

ब) साइट ब्रिफिंग व्यतिरिक्त ही माहिती दिली पाहिजे.

## वैद्यकीय बाबी :

प्रत्येक जलतरणपटूने त्याला स्नॉर्केलिंग करण्यापसून रोखू शकेल अशी कुठलीही शारीरिक स्थिती नसल्याबद्दलचा वैद्यकीय फॉर्म भरावा. जर त्यांची अशी काही शारीरिक स्थिती असेल तर एखाद्या वैद्यकीय व्यावसायिकाकडून त्यांना स्नोर्केल करण्यास मनाई नसल्याचे प्रमाणपत्र घ्यावे.

## गरजेची मूलभूत मानके :

अ) ऑपरेटरची स्थानिक पर्यटन विभागाकडे नोंदणी करावी.

ब) कर्मचारी कलम (2) मध्ये दिलेली पात्रता पूर्ण करणारे असावेत.

क) आपण जेवढ्या स्नोर्केलर्सना सेवा देणार आहोत तेवढ्या लोकांना पुरेसा साधन सामग्रीचा संच केंद्राकडे असला पाहिजे.

ड) ऑपरेटरकडे आपत्कालीन कृती आराखडा असणे आवश्यक आहे. त्यासाठी कर्मचाऱ्यांना नियमित प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

इ) कोणीही 'फ्री डाइव्ह' करणार नाही याची केंद्राने खात्री केली पाहिजे . कारण त्यामुळे अशी व्यक्ती प्रवाळावर जाऊ शकते जे हानिकारक आहे.

फ) जिथे सक्षम अधिकाऱ्यांकडून स्नॉर्केलिंगसाठी स्नॉर्केलिंगची परवानगी दिली जाते अशा भागातच स्नॉर्केलिंग आयोजित करावे.

DRAFT

# ५. काइट बोर्डींग

## परिचय

काइटबोर्डिंग हा वेकबोर्डिंग, स्नोबोर्डिंग, विंडसर्फिंग, सर्फिंग, पॅराग्लायडिंग, स्केटबोर्डिंग आणि जिम्नॅस्टिक्स या पैलूंची सांगड घालणारा सरफेस वॉटर स्पोर्ट आहे. काइटबोर्डर पॉवर काइटच्या सहाय्याने वाऱ्याच्या शक्तीचा वापर करतो आणि वेकबोर्ड किंवा छोट्या सर्फबोर्डसारख्या बोर्डवर उभा राहून पाण्यावरून प्रवास करतो (पादत्राणांसकट किंवा त्यांच्या विना).
काइटबोर्डिंग ही वेव्ह रायडिंगसाठी विशिष्ट शैली आहे, ज्यासाठी खासकरून बनवलेले सर्फबोर्ड किंवा बोर्ड वापरतात.
काइटबोर्डिंग हा एक नवीन खेळ आहे, ज्याला जगभरात लोकप्रियता मिळत आहे. हा एक वैयक्तिक खेळ आहे आणि ह्यात नवोदितांसाठी 'जॉय राइड्स' नसतात. मोकळ्या पाण्यात पोहण्याचे पूर्वकौशल्य असलेल्या विद्यार्थ्यांना हा खेळ शिकवावा लागतो. काइटबोर्डिंग ऑपरेटर्स नवोदितांसाठी धडे देतात, आणि अनुभवी रायडर्सना साहित्य भाड्याने देतात, किंवा सहली आयोजित करतात. काइटबोर्डिंग वाऱ्याच्या स्थितीवर अवलंबून असल्यामुळे धडे देण्याच्या ठिकाणी अध्यापन आणि सरावासाठी योग्य परिस्थिती असायला हव्यात. भारतात काइटबोर्डिंग कोणताही अपघात झालेला नाही. खबरदारी, जागरूकता आणि सुरक्षा मानके ह्यांनी अपघात रोखले जाऊ शकतात.

## प्रशिक्षित मनुष्यबळ

काइटबोर्डिंग धडे घेण्याची जबाबदारी असलेल्यांना धडे, बचाव तंत्र, पॉवरबोट हाताळणी आणि प्रथमोपचार/सी.पी.आर. ह्याची संपूर्ण माहिती असणे गरजेचे आहे.

## मार्गदर्शक/ प्रशिक्षक

काइटबोर्डिंग प्रशिक्षकांकडे कमीत कमी खालील गोष्टी असल्या पाहिजेत;

a. काइटबोर्डिंगसाठी मान्यताप्राप्त राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय संस्थेची पात्रता आणि ऑपरेटरकडून "काइटबोर्डिंग चा ३ वर्षे अनुभव आहे आणि स्वतंत्रपणे शिकवण्यास, मदत करण्यास, सहलींचे नेतृत्व करण्यास आणि बचावकार्य करण्यास स्वतंत्रपणे सक्षम आहे" - असे प्रमाणपत्र
b. काइटबोर्डिंगच्या धड्यांचे प्रमाणित रेकॉर्ड असलेले लॉगबुक/ई-बुक
c. मान्यताप्राप्त वैध प्रथमोपचार/सीपीआर प्रमाणपत्र
d. मान्यताप्राप्त पॉवरबोट परवाना प्रमाणपत्र
e. मान्यताप्राप्त ओपन वॉटर लाईफ गार्ड सर्टिफिकेट

DRAFT

## उपकरणे

a. LEI/FOIL डिपॉवर सक्षम आणि पाणी लाँच काइट वाऱ्याच्या वेगवेगळ्या परिस्थितीत व्यवस्थित चालणारे विविध काइट
b. शिकवण्यासाठी छोट्या आणि अनुभवी रायडर्ससाठी मोठ्या लाइन आणि काइटच्या आकाराशी जुळणारे काइट-बार
c. नवोदितांसाठी बोर्डलीज नसलेल्याबोर्डवर पाय अडकवण्यासाठी पट्टे असलेले काइटबोर्ड
d. ग्राहकांसाठी वेगवेगळ्या आकारात सेफ्टी लीश, हेल्मेट आणि हार्नेस
e. धडे सुरू करण्यापूर्वी वाऱ्याचा वेग तपासण्यासाठी एक ॲनेमोमीटर
f. समुद्रकिनाऱ्यावरील प्रशिक्षणासाठी दोन लाइन असलेले प्रशिक्षक काइट
g. लाइफ जॅकेट्स किंवा पर्सनल फ्लोटिंग डिव्हाइसेस (PFD) - (तरंगण्याची किमान आवश्यकता पूर्ण करणे आवश्यक आहे - ISI, अमेरिकी तटरक्षक दल, ब्रिटिश कॅनो युनियन किंवा समकक्ष) ह्यांनी प्रमाणित/ मंजूर केले पाहिजे
h. मोकळ्या पाण्याचे प्रशिक्षण असल्यास, बचाव कार्य करण्यासाठी/ चालवण्यासाठी पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांबरोबर त्वरित तैनात करण्यासाठी सुरक्षा / बचावासाठी बोटी जवळच्या परिसरात (दृश्य अंतरावर) उपलब्ध असाव्यात याची खात्री केली पाहिजे

## तपासणी आणि देखभाल धोरण

a. तपासणी आणि देखभालीसाठी प्रणाली आणि उपकरणांचे पूर्ण ज्ञान असणे आवश्यक आहे. तपासणी करणारा कमीत कमी योग्य मार्गदर्शक/ प्रशिक्षक असणे आवश्यक आहे. त्यांच्या कार्यपद्धती आणि जोखीम मूल्यांकनानुसार नियमितपणे केलेल्या पद्धतीनुसार प्रत्येक वापरापूर्वी मूलभूत तपासणी करणे आवश्यक आहे.
b. काइट प्रशिक्षक, मदतनीस आणि रेस्क्यू बोट यांनी दळणवळणाची उपकरणे नेहमी वाहून नेणे आवश्यक आहे.

## ऑपरेशन्स

a. उपक्रम सुरू करण्याआधी संपूर्ण हवामान तपासणी करणे आवश्यक आहे आणि कोणतेही कार्य सुरू करण्यापूर्वी प्रदर्शित करणे आवश्यक आहे.
b. काइटबोर्डिंगच्या सर्व उपक्रमांची सुरुवात संपूर्ण सुरक्षा माहितीने करणे आवश्यक आहे. या माहितीत वापरली जाणारी उपकरणे, काय करावे आणि काय करू नये करू, बचाव आणि आपत्कालीन प्रक्रिया आणि तत्कालीन हवामानाच्या परिस्थितीसाठी उपक्रमांची सीमा आखणे आवश्यक आहे. सर्व सहभागींना दायित्व माफी फॉर्मवर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे, उपक्रम सुरू होण्यापूर्वी संबंधित जोखीम स्पष्टपणे अधोरेखित करणे आवश्यक आहे. जर कोणतीही

वैद्यकीय कारणास्तव सहभागी होणारी व्यक्ती अपात्र असेल तर त्यांनी उपक्रम सुरू होण्यापूर्वी कळवले पाहिजे आणि त्यांना सहभागी होण्याची परवानगी नसावी.

c. मोकळ्या पाण्यात पोहण्याचे पूर्वकौशल्य असलेल्या विद्यार्थ्यांनाच धडे दिले पाहिजेत.
d. काइटबोर्डिंगच्या प्रशिक्षकाने उड्डाणापूर्वी तपासणी करावी.
e. विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाऱ्यावर स्वार होऊन उड्डाण करू शकणाऱ्या अनुभवी स्वतंत्र रायडर्सनाच काइट भाड्याने द्यावेत.
f. विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाऱ्यावर स्वार होऊन उड्डाण करू शकणाऱ्या अनुभवी स्वतंत्र रायडर्स साठीच काइट सफर आयोजित कराव्या.
g. सुरक्षा बोट असल्याशिवाय काइटचे धडे, भाड्याने देणे किंवा सहली आयोजित करू नयेत. धडे सुरू करण्यापूर्वी सुरक्षा बोट पाण्यावर असणे आवश्यक आहे. सुरक्षा / बचावासाठी बॅकअप बोटीची उपलब्धता जवळच्या परिसरात (दृश्य अंतरावर) उपलब्ध असणे आवश्यक आहे जेणेकरून ती बोट बचावकार्य करण्यास पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांसह त्वरित तैनात करता यावी.

## जोखीम निवारण

a. लाइफ जॅकेट्स : पाण्यात असायच्या संपूर्ण वेळेत लाईफ जॅकेट/न घालता काइटबोर्डिंगच्या कोणतीही कृती करू नये. लाईफ जॅकेटला पुरेशी तरंगण्याची कुवत असणे आवश्यक आहे, कृती सुरू करण्यापूर्वी प्रशिक्षकाने लाईफ जॅकेट योग्य प्रकारे बांधले पाहिजे आणि तपासले पाहिजे. लाईफ जॅकेट इच्छित वापरकर्त्यासाठी योग्य आकाराचे असले पाहिजे.
b. प्रशिक्षित लाईफ गार्ड किंवा मार्गदर्शकाच्या उपस्थितीशिवाय काइटबोर्डिंगचा कोणताही उपक्रम राबवता कामा नये.
c. उपक्रमादरम्यान आणि आधी किमान सहा तास आधी मद्य सेवनावर सक्त बंदी असावी.
d. माहिती फलक - देखरेखीशिवाय काइटबोर्डिंगचे कोणतेही काम केले जाणार नाही, असे स्पष्टपणे नमूद केले असावे.
e. काइटबोर्डिंगचा कोणताही उपक्रम अंधारात आयोजित करू नये आणि  अंधाराच्या एक तास आधी संपवावा.

## SOP (आदर्श कार्यपद्धती) आणि ऑपरेटिंग सूचना

a) सर्व काइटबोर्डिंग ऑपरेटर्सनी त्यांच्या ऑपरेशन्ससाठी मानक ऑपरेटिंग प्रक्रिया राखणे आणि अद्ययावत करणे आवश्यक आहे.
b) उपक्रमाच्या आयोजनात एजन्सीने स्वीकारलेल्या पद्धतींचा समावेश करण्याव्यतिरिक्त, जसे की सदस्यांच्या वैद्यकीय स्थितीचे आणि अनुभवाचे मूल्यमापन करणे, कृती चालवण्याच्या प्रक्रिया, दुखापत टाळणे, सुरक्षेची खबरदारी, दळणवळण, हवामान, प्रक्रिया इत्यादींचा कार्यपद्धतीत समावेश असावा.

c) आपत्कालीन कृती योजना असली पाहिजे आणि वैद्यकीय मदतीसाठी व्यवस्था माहिती असणे आवश्यक आहे. आपत्कालीन परिस्थितीत बाहेर काढण्याच्या मदतीसाठी ही व्यवस्था आधीपासून करून ठेवणे आवश्यक आहे.

d) जाहिरातींनी संबंधित सर्व अडचणी आणि धोक्यांचे खरे चित्र दिले पाहिजे आणि खोटे आश्वासन देण्याचे टाळले पाहिजे. सर्व विद्यार्थ्यांना याची जाणीव असली पाहिजे की काइटबोर्डिंग हा खेळ पात्र प्रशिक्षकाच्या मार्गदर्शनाखालीच शिकावा लागतो.

## दस्तऐवजीकरण

f) काइटबोर्डिंग ऑपरेटरने खालील दस्तऐवज ठेवणे आवश्यक आहे:

g) प्रमाणपत्रांच्या प्रती, अनुभवाची नोंद आणि ग्राहकांकडून अभिप्रायासह सर्व प्रशिक्षकांचा तपशील.

h) ऑपरेशन्ससाठी आवश्यक असलेल्या सर्व परवानग्या आणि परवानग्यांच्या प्रती.

i) ओळख दस्तऐवजांच्या प्रती, सर्व सहभागी आणि प्रशिक्षकांसाठी नातेवाइकांचा आपत्कालीन संपर्क तपशील.

j) एसओपीची प्रत.

k) आपत्कालीन संपर्क क्रमांकांची ताजी यादी.

## आपत्कालीन परिस्थिती आणि बचाव

l) आयोजकांकडे पुरेशी प्रथमोपचार वैद्यकीय उपकरणे उपलब्ध असणे आवश्यक आहे.

m) आपत्कालीन परिस्थितीत निर्वासन मार्ग पाहिजेत आणि सहभागी, मार्गदर्शक आणि प्रशिक्षकांना ते माहिती पाहिजे.

n) सविस्तर आणि कागदोपत्री निर्वासन / आपत्कालीन कृती आराखडा आयोजका बरोबर उपलब्ध असणे आवश्यक आहे.

## सुरक्षा माहिती

o. संपूर्ण सुरक्षा माहिती देणे आवश्यक आहे, ह्यात खालील गोष्टींचा समावेश असावा

xvi)उपकरणे सुरक्षा यंत्रणा

xvii)सभोवतालचा पर्यावरण

xviii)जागरूकता

xix)उपक्रामाच्या ठिकाणी असलेले धोके

t. खेळासाठी किमान फिटनेसची गरज.

DRAFT

u. सुरक्षा माहिती दरम्यान व्यक्त होणारे सर्व मुद्दे नेहमी प्रशिक्षकाच्या संदर्भासाठी सूचीबद्ध करणे आवश्यक आहे.

v. प्रशिक्षकाने सुरक्षा माहिती देताना सहभागींची माहिती गोळा केली पाहिजे.

## वैद्यकीय पैलू

w. सहभागीला मोकळ्या पाण्यात आरामात पोहता येते याची प्रशिक्षकाने खात्री करणे आवश्यक आहे.

x. प्रशिक्षकाने सहभागीला शिकण्यासाठी किंवा सहलीत सहभागी होण्यासाठी वैद्यकीयदृष्ट्या योग्य असल्याची खात्री करणे आवश्यक आहे.

y. आधीच्या दुखापती किंवा वैद्यकीय समस्यांबद्दल काही शंका असल्यास सहभागीकडून स्वाक्षरी केलेली घोषणा आवश्यक आहे.

z. ज्यांना हृदयविकार, अपस्मार, पाठीच्या कण्याच्या समस्या, अलीकडील शस्त्रक्रिया किंवा इतर कोणत्याही वैद्यकीय स्थिती असल्यास काइटबोर्डिंग करू नये. गर्भवती महिलांनी काइटबोर्डिंग टाळले पाहिजे.

## ऑपरेटर्ससाठी शिफारस केलेली 'मूलभूत मानके'

सर्व काइटबोर्डिंग ऑपरेटर्सनी मान्यता मिळवण्यासाठी खालील किमान मानकांचे पालन केले पाहिजे. काइटबोर्डिंग ऑपरेटर्स ही एक व्यावसायिक संस्था असली पाहिजे. मालक किंवा कर्मचारी खेळात अनुभवी आणि प्रमाणित असणे आवश्यक आहे. खालील मुद्द्यांमध्ये मान्यतेसाठी विचारात घेतले जाणारे आवश्यक मुद्दे समाविष्ट आहेत.

aa.प्रमाणित प्रशिक्षक आणि मार्गदर्शक

xxviii.काइटबोर्डिंग साठी मान्यताप्राप्त राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय संस्थेची पात्रता आणि ऑपरेटरकडून प्रमाणपत्र की "त्या व्यक्तीला विशिष्ट उपक्रमात काम करण्याचा 3 वर्षांचा अनुभवआहे आणि स्वतंत्रपणे अध्यापन, मदत, सहली आणि बचाव कार्य करण्यास सक्षम आहे."

xxix.मान्यताप्राप्त आणि वैध प्रथमोपचार/सीपीआर प्रमाणपत्र.

xxx.मान्यताप्राप्त पॉवरबोट परवाना प्रमाणपत्र.

xxxi.मान्यताप्राप्त ओपन वॉटर लाईफ गार्ड सर्टिफिकेट.

b.जागेचा नकाशा आणि माहिती

iii.काइटबोर्डिंगच्या जागेचा नकाशा सर्व सहभागींना स्पष्टपणे प्रदर्शित केला पाहिजे ज्यात "सुरक्षित क्षेत्र" आणि "धोका क्षेत्र" असेचिन्ह असावे.

iv. सर्व सहभागींना संपूर्ण सुरक्षा माहिती देणे आवश्यक आहेआणि ऑपरेशन बेसवर प्रदर्शित केलेले महत्त्वाचे मुद्दे दस्तऐवजीकरण करणे आवश्यक आहे.

e. लाईफगार्ड आणि रेस्क्यू बोट

vi. मोकळ्या पाण्याचे प्रशिक्षण देत असल्यास, बचाव कार्य करण्यास पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांसोबत त्वरित तैनात करता येणाऱ्या सुरक्षा/बचावासाठी बोटी उपलब्ध असणे आवश्यक आहे.

d. ऑपरेशन्स आणि देखभाल मॅन्युअल

v. मानक ऑपरेटिंग प्रक्रिया, आपत्कालीन कृती आराखडा आणि उपकरणे चेकलिस्टच्या तपशीलासह मॅन्युअलची एक प्रत लोकेशनवर असावी

vi. पुस्तिका दरवर्षी अद्ययावत करणे आवश्यक आहे.

e. दर्जेदार उपकरणे

vi. अध्यापन, सहली किंवा भाड्यासाठी वापरली जाणारी उपकरणे उत्कृष्ट स्थितीत ठेवणे आवश्यक आहे.

vii. काइटबोर्डिंग ऑपरेटरकडे जमिनीवरील अभ्यासासाठी लहान आकाराचे प्रशिक्षक काइट असावेत. नवोदितांच्या प्रशिक्षणासाठी छोट्या लाइन असलेले बार अनिवार्य आहेत.

viii. लाईफ-जॅकेट्स, हार्नेस आणि हेल्मेट सर्व आकारात (XS, S, M, L, XL) जोड्यांमध्ये उपलब्ध असले पाहिजेत.

DRAFT

# ६. रिव्हर क्रूझिंग

## परिचय

नदीतील क्रुझ म्हणजे एका छोट्या आकाराच्या क्रूझ जहाजातून, विविध उपक्रमांचा अनुभव घेत एखाद्या नदीच्या काठावर असलेल्या ठिकाणांना भेटी देणे.

जहाजांमध्ये तारांकित हॉटेल्सच्या सुविधा उपलब्ध असून इतरही आवश्यक गोष्टी उपलब्ध असतात. तसेच जहाजातून सफारी आणि सहली केल्या जातात. हा साहसी उपक्रम पाण्यावर आधारित असल्याने मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे ज्यायोगे उपक्रम सुरक्षितपणे राबवला जाईल. तसेच प्रवासी आणि कर्मचारी यांना नेव्हिगेशन दरम्यान अपघात होणार नाही याचीही काळजी घेतली जाईल.

## मार्गदर्शक / प्रशिक्षक

रिव्हर क्रूझ जहाजाचे कार्यक्षेत्र प्रामुख्याने नौकानयन शास्त्र, जल पर्यटन, पर्यटन आणि आदरातिथ्य या तीन गोष्टीत विभागले जाऊ शकते.

नौकानयनाचे नेतृत्व जहाजाच्या प्रमुखाचे म्हणजेच मास्टर ऑफ द शिपकडे असते. तो फर्स्ट क्लास मास्टर रँक धारक असतो आणि त्याच्याकडे तसा

परवाना असणे गरजेचे आहे. तसेच त्याच्या मदतीला परवानाधारक सेकंड क्लास मास्टर असतो. साधारणपणे जहाजांत एक परवानाधारक इंजिन ड्रायव्हर असतो जो जहाजावर इंजिनीअर म्हणूनही काम करू शकतो. तसेच त्याच्या मदतीला सेकंड क्लास इंजिन ऑपरेटर असतो. याहे सर्व हुद्दे Inland Vessel Operations Statutory laws मध्ये स्पष्टपणे नमूद केले आहेत.

## उपकरणे

या ठिकाणी जहाज हेच उपकरण आहे आणि ते देशातील सागरी जहाज बांधणी कायद्यानुसार बांधलेले असावे लागते. हे कायदे सुस्पष्ट आहेत . केरळ, आसाम, पश्चिम बंगाल, बिहार आणि उत्तर प्रदेश सारख्या राज्यात, जिथे संचार करण्यायोग्य नद्या आहेत, तेथील अंतर्गत जलमार्ग प्राधिकरणाकडून या कायद्याच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवले जाते.

अधिक आंतरराष्ट्रीय गुणवत्ता मानांकनासाठी, जहाजाची रचना आणि बांधकाम, इंडियन रजिस्टर ऑफ शिप्स, लॉईड्स इत्यादी जहाज वर्गीकरण सोसायटीच्या सर्वेक्षण आणि मंजुरीप्रमाणे असू शकते. जहाजाची रचना आणि वेल्डिंगच्या गुणवत्तेसह जहाज बांधणीच्या प्रत्येक टप्प्याची या संस्थांशी संलग्न अशा पात्र सर्वेक्षकांकडून तपासणी केली जाते. त्यानंतर अशा जहाजांचा दर्जा प्रमाणित करण्याशी हे सर्वेक्षक कायद्याने बांधील असतात.

जहाज बांधणी कमी दर्जाची असल्याने जर काही दुर्घटना घडल्यास, जहाज बांधणी सर्व्हेअरला कायद्याने गुन्हेगार म्हणून जबाबदार धरले जाते. जहाज बांधणीत वापरण्यात येणारी मूळ उपकरणे

जेव्हा तयार होत असतात तेव्हा अशा कारखान्यात क्लास सर्टिफिकेशन सोसायटीच्या सर्वेक्षकांकडून प्रत्येक टप्प्यावर तपासणी केली जाते .

## तपासणी आणि देखभाल प्रक्रिया

जहाजाला प्रमाणित करण्यासाठी आणि जहाजाला फिटनेस सर्टिफिकेट देण्यासाठी क्लास सर्टिफिकेशन सोसायटी आणि राज्य जलमार्ग प्राधिकरण वार्षिक तपासणी करतात. जर जहाज गोड्या पाण्यात कार्यरत असेल तर दर पाच वर्षांनी आणि खाऱ्या पाण्यात कार्यरत असेल तर दर दोन वर्षांनी कोरड्या गोदीमध्ये न्यावे लागते. तिथे या दोन्ही संस्थांकडून जहाजाच्या पाण्याखाली असणाऱ्या भागांची सखोल तपासणी केली जाते.

## मानक कार्य प्रणाली (S.O.P) आणि प्रत्यक्ष कृतीसाठी सूचना

नौकानयन विषयी सर्व कार्य जहाजाच्या फर्स्ट क्लास मास्टरने आखून दिलेल्या पद्धतीने होते आणि इंजिन आणि यंत्रांसाठी, मुख्य अभियंता म्हणून काम करणाऱ्या एल.सी. ड्रायव्हरने निश्चित केलेल्या पद्धतीनुसार होते. याची दैनंदिन लॉग बुकमध्ये नोंद केली जाते आणि प्रत्येक यंत्राची नियमित देखभाल आणि दुरुस्ती वेळोवेळी केली जाते. क्लास सर्टिफिकेशन सोसायटी आणि राज्याच्या वैधानिक प्राधिकरणाच्या वार्षिक तपासणीचा हा एक भाग आहे.

## दस्तऐवजीकरण

क्लास सर्टिफिकेशन सोसायटी आणि राज्य वैधानिक प्राधिकरण या दोघांनी दिलेल्या जहाजाचा सर्वेक्षण अहवाल आणि जहाज कार्यरत ठेवण्यासाठीचा परवाना हा मुख्य कागदपत्रांचा भाग आहे.

## जोखीम निवारण

जहाज, कर्मचारी आणि पाहुण्यांचा विमा, जहाजाचा प्रारंभिक आराखडा आणि बांधणीवरील देखरेख, नियमित वार्षिक देखभाल आणि तपासणी, पात्र क्रू मेंबर्सची नेमणूक हा जोखीम निवारण प्रक्रियेचा भाग आहे. 'एटीओएआय' सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वांनुसार किनारपट्टीवरील सर्व सहली केल्या जातात याची रिव्हर क्रूझ ऑपरेटरला खात्री करावी लागते.

## आणीबाणी आणि बचाव

क्लास सर्टिफिकेशन सोसायटीच्या आणि वैधानिक नियमानुसार अशी जहाजे सज्ज केली जातात , त्यात अग्निशमन उपकरणे (फायर फायटिंग अप्लायन्सेस) आणि जीव रक्षक उपकरणे (लाईफ सेव्हिंग अप्लायन्सेस) असतात. या प्रणाली आणि परवाना प्रक्रियेचा भाग असलेले कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण कोणत्याही आपत्कालीन/बचावकार्यासाठी पुरेसे आहे. रिव्हर क्रूझ असल्यामुळे ती

जमिनीच्या जवळ असतात आणि समुद्रातील जहाजांच्या तुलनेत त्यांच्यापुढील आव्हाने खूपच कमी असतात.

## सुरक्षा विषयक माहिती

जहाजावर प्रवेश केल्यावर सुरक्षेसंबंधित सर्वंकष माहिती दिली गेली पाहिजे. आणीबाणीच्या परिस्थितीत काय करावे याचे प्रात्यक्षिक दाखवावे. तसेच चित्रात्मक प्रात्यक्षिके, लाइफ वेस्टचा वापर, लाइफ बोटींमध्ये चढण्यासाठी मस्टर स्टेशन्स इत्यादींची सविस्तर माहिती देणे जरुरी आहे.

## वैद्यकीय बाबी

बहुतेक रिव्हर क्रूझच्या जहाजांमध्ये एक वरिष्ठ नर्सिंग अटेंडंट असतो जो उच्च शिक्षित प्रथमोपाचारक असतो. या शिवाय, रिव्हर क्रूझ जहाजे जमिनीवरील रस्त्यांच्या नियमित संपर्कात येत असल्याने रुग्णवाहिका आणि हेलिकॉप्टर्स या दोन्हींची व्यवस्था केली जाऊ शकते.

## ऑपरेटर्सना मान्यता देण्यासाठी मूलभूत किमान मानके

रिव्हर क्रूझ जहाजांना राज्य वैधानिक प्राधिकरणाकडून मंजुरी असणे बंधनकारक आहे. क्लास सर्टिफिकेशन सोसायटीकडून सर्वेक्षण / मंजुरी मिळवण्याचीही शिफारस करण्यात आली आहे, त्यांचे सर्व्हे पळवाट रहित ) आणि उच्च दर्जाचे असतात.

DRAFT

# ७. स्कूबा डायव्हिंगसाठी सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वे

स्कूबा (सेल्फ कंटेंड अंडरवॉटर ब्रीदिंग ॲपरेटस) डायव्हिंग हा एक पाण्यातील साहसी उपक्रम आहे ज्यामुळे लोकांना सागरी जगाशी ओळख करता येते. योग्यरीत्या केल्यास हा उपक्रम आनंददायक, परिपूर्ण आणि सुरक्षित आहे. परंतु अंमलबजावणीत गुणवत्ता निश्चित करण्यासाठी सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.

या मार्गदर्शक सूचनेत 'डायव्हिंग' हा शब्द फक्त मनोरंजनासाठी केलेल्या डायव्हिंगचे वर्णन करण्यासाठी वापरला आहे. व्यावसायिक आणि लष्करी डायव्हर आणि इतर व्यावसायिक डायव्हर यांनी सुद्धा त्यांच्या या नियमांचे पालन केले पाहिजे.

## डाइव्ह प्रशिक्षक आणि डायव्ह मास्टर :

**किमान पात्रता आणि** अनुभव

1. प्रत्येक स्कूबा डायव्हिंग सेंटरमध्ये कमीतकमी एक डायव्ह प्रशिक्षक आणि एक डायव्ह मास्टर असणे आवश्यक आहे.
2. डाइव्ह प्रशिक्षकाकडे मान्यताप्राप्त राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय डायव्हिंग संस्था / संघटना (एनआयडब्ल्यूएस / पीएडीआय, एनएयूआय, सीएमएएस इत्यादी) कडून वैध शिकवणी परवाना असणे आवश्यक आहे.
3. डाइव्ह मास्टरकडे अद्ययावत व वैध परवाना असणे आवश्यक आहे.
4. केवळ डायव्हर प्रशिक्षक प्रशिक्षण देऊ शकतात आणि विद्यार्थ्यांना प्रमाणित करू शकतात. डाइव्ह मास्टर सहाय्यक भूमिका निभावतात. कोणत्याही परिस्थितीत डाइव्ह मास्टरला प्रशिक्षण देण्याची परवानगी देऊ नये.
5. डायव्हर केंद्राने हे सुनिश्चित केले पाहिजे की त्यांच्याकडे उपक्रमासाठी पुरेसे प्रशिक्षक आहेत. तसेच उपक्रमाला लागणाऱ्या यादीनुसार उपकरणेदेखील आहेत.

6. मनोरंजनासाठी डाईव्ह आयोजित करणाऱ्या डाइव्ह केंद्रामध्ये किमान एक साइट सुपरवायझर (ईएफआर सर्टिफाइड लाइफ सेव्हर), एक प्रमाणित प्रशिक्षक, दोन प्रमाणित डाइव्ह मास्टर, एक ईएफआर प्रमाणित लाइफ सेव्हर व आवश्यकतेनुसार सहायक कर्मचारी (बोट-बॉय) असावेत.
7. सर्व डाईव्ह केंद्रांची मानकांनुसार स्वतःची वेबसाइट असणे आवश्यक आहे आणि त्यात प्रदान केलेल्या सर्व उपक्रमांची माहिती असली पाहिजे. याशिवाय त्यात अतिथी / प्रशिक्षणार्थींच्या माहितीसाठी उपक्रमाची फी, कालावधी, पात्रता, प्रत्येक कोर्सची माहिती इत्यादी देखील नमूद करणे आवश्यक आहे.
8. उपक्रम मनोरंजनासाठी असो वा प्रशिक्षणासाठी, सर्व सहभागींसाठी निर्धारित उपक्रमाच्या अनुषंगाने वर्गभिक्षण सत्र आयोजित करावे. हे सुनिश्चित करणे डाइव्ह केंद्रासठी अनिवार्य आहे.
9. सूचना फलक

## डायव्हिंग केंद्र - आवश्यक बाबी

1. सर्व डायव्हिंग केंद्र स्थानिक पर्यटन विभागात नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.
2. सर्व डायव्हिंग केंद्र आपत्कालीन ऑक्सिजनने सुसज्ज असले पाहिजेत आणि त्यांच्याकडे डायव्हिंग संबंधित अपघातांच्या बाबतीत आपत्कालीन योजना तयार असावी. आपत्कालीन योजनेत खालील बाबींचा समावेश असावा:

- हरवलेल्या डायव्हरांचा शोध आणि बचाव
- प्रथमोपचार प्रदान करणे
- जवळच्या योग्य वैद्यकीय सुविधेपर्यंत वाहतूक व्यवस्था
- योग्य अधिकाऱ्यांना अहवाल (पोलिस, नौदल, तटरक्षक दल, पर्यटन मंत्रालय इ.)

3. डायव्हिंग केंद्राचे सर्व कर्मचारी या आपत्कालीन योजनेशी परिचित असले पाहिजेत आणि योग्य ते कार्य करण्यास सक्षम असले पाहिजेत.

4. डाइव्ह सेंटरमध्ये बेस लीडर किंवा व्यवस्थापक असणे आवश्यक आहे जो डायव्हर केंद्राच्या उपक्रामासाठी जबाबदार असेल. डायव्ह सेंटर व्यवस्थापक प्रशिक्षक किंवा डायव्ह मास्टर असणे आवश्यक आहे.
5. डायव्हिंग केंद्राचा बेस लीडर अनुपस्थित असल्यास, सहाय्यकाने केंद्राची जबाबदारी स्वीकारली पाहिजे.
6. डायव्हिंग केंद्रात आयोजित होणाऱ्या अभ्यासक्रमांसाठी पुरेशी उपकरणे सुटे भाग, प्रशिक्षण सामग्री असणे आवश्यक आहे.
7. डायव्हिंग केंद्रात सर्व सेवा, आयोजित होणाऱ्या अभ्यासक्रम आणि त्यांचे शुल्क यांची यादी लेखी स्वरूपात उपलब्ध असणे आवश्यक आहे.
8. डायव्हिंग केंद्रात मध्ये कर्मचाऱ्यांसाठी आणि सहभागींसाठी डीकंप्रेशन चेंबर ट्रीटमेंटच्या कव्हरेजचा समावेश असलेला डाइव्ह विमा असणे आवश्यक आहे.

## साधनसामग्री

## डायव्हिंग उपकरणे

प्रत्येक डायव्हिंग केंद्रात त्याच्या उपक्रमासाठी लागणारी संपूर्ण उपकरणे पुरेशा प्रमाणात असावी. यात खालील गोष्टींचा समावेश असावा:

9. हवा आणि / किंवा नायट्रॉक्स सिलेंडर (योग्य रीत्या लेबल केलेले).
10. मनोरंजनासाठी आयोजित होणाऱ्या डायव्हिंगसाठी बॉयन्सी कंट्रोल डिव्हाइस (बीसीडी) विविध आकारात आणि लो प्रेशर इन्फ्लेटर. बीसीडीची देखभाल निर्मात्यांच्या सूचनेनुसार करावी.
11. निर्मात्याद्वारे मनोरंजनासाठी आयोजित होणाऱ्या डायव्हिंगसाठी मान्यता दिलेले आणि देखभाल केलेेले रेग्युलेटर. यामध्ये सबमर्सिबल प्रेशर गेज आणि पर्यायी हवा स्त्रोत असावेत.
12. निर्मात्याद्वारे मनोरंजनासाठी आयोजित होणाऱ्या डायव्हिंगसाठी मान्यता दिलेले आणि देखभाल केलेेले मास्क, फिन, स्नोर्कल, वेट सूट.

13. वजन आणि वजन पट्टे.

14. डायव्हिंग केंद्रात कर्मचाऱ्यांसाठी पाण्याची खोली, वेळ आणि डीकंप्रेशन बद्दल माहिती पुरवणारे डाइव्ह कॉम्प्यूटर.

15. डायव्हरना आपले वेळापत्रक तयार करण्यासाठी डाईव्ह टेबल्स (तक्ता) उपलब्ध असणे आवश्यक आहे.

16. इमर्जन्सी सिग्नलिंग डिव्हाइस - रिफ्लेक्टिव्ह इन्फ्लाटेबल सरफेस बलून (सरफेस मार्कर बॉय) आणि शिट्टी.

17. रात्रीच्या डायव्हिंगसाठी उपयुक्त पाण्याखालचे टॉर्च.

## डाइव्ह नौका

नौका डायव्हिंग आयोजित करणाऱ्या सर्व डाइव्ह सेंटर्समध्ये अटीनुसार आणि खालीलनुसार डाइव्ह नौका असणे आवश्यक आहे:

1. सहभागींच्या संख्येनुसार क्षमतेची. भरलेले सिलिंडर, सर्व आवश्यक सुरक्षा, बचाव आणि रिकव्हरी उपकरणे, प्रथमोपचार किट, इमर्जन्सी ऑक्सिजन सिलिंडर ठेवण्यासाठी कप्पे असलेली.

2. नौकेत प्रथमोपचार, सीपीआर इत्यादी देण्यासाठी पुरेशी जागा असावी.

3. नौकेला प्रत्येकी किमान साठ एचपीची दोन इंजिने असली पाहिजेत; किंवा इंजिन मध्ये बिघाड झाल्यास बॅकअप इंजिन असले पाहिजे.

4. नौकेची एम.एस. ॲक्ट / आय.व्ही. ॲक्टनुसार नोंदणी असणे आवश्यक आहे आणि नौकेची बांधणी आयआरएस किंवा त्यातील दुस-या सक्षम प्राधिकरणाने मंजूर केल्याप्रमाणे असणे आवश्यक आहे. नौकेची वार्षिक पुनर्नोंदणी केली पाहिजे आणि अशाच नौका उपक्रामासाठी वापरल्या पाहिजेत.

5. कायद्यानुसार नौकेला आणि सहभागींना वैध विमा संरक्षण असणे आवश्यक आहे.

6. परवानाधारक मास्टरनेच नौका चालवली पाहिजे. त्याच्याकडे "बोट हँडलिंग आणि लाइफ सेव्हिंग " चे वैध प्रमाणपत्र असले पाहिजे.

7. डाइव्ह प्रशिक्षक आणि डाइव्ह मास्टर व्यतिरिक्त, योग्य प्रमाणित जीवन बचत तंत्र असलेल्या किमान एका व्यक्तीला संपूर्ण उपक्रमादरम्यान डाइव्ह नौकेवर असणे आवश्यक आहे.

8. नौकेवर असताना प्रत्येकाने योग्य आकाराचा पीएफडी (पर्सनल फ्लोटशन डिव्हाइस) घालणे बंधनकारक आहे.

9. डायव्हिंग ठराविक ठिकाणीच केले जाते, जेथे साइटचे सीमांकन इत्यादींसह मानके आणि अटींनुसार सर्व खबरदारी घेतली जाते.

## उपकरणे - देखभाल

1. डाइव्हिंग सेंटरमधे उच्च दाबाच्या हवेचे सिलिंडर भरण्यात येत असतील, तर गेल्या पाच वर्षांत हायड्रोस्टॅटिक प्रेशर चाचणी न झालेले सिलिंडर वापरू नयेत. डाइव्ह सेंटरच्या कर्मचाऱ्यांना याची जाणीव करून द्यावी.

2. उपकरणे आणि कॉम्प्रेसर ची देखभाल दरवर्षी केली पाहिजे आणि हवेची गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी कॉम्प्रेसर्सचे तेल नियमितपणे बदलणे आवश्यक आहे.

3. प्रत्येक डाइव्हनंतर सर्व उपकरणे धुवून, वाळवून नीट तपासणे आवश्यक आहे.

## मानक प्रणाली (SOP) आणि उपक्रम सूचना

## निव्वळ मनोरंजनासाठी डाइव्ह करणारे : किमान पात्रता

निव्वळ मनोरंजनासाठी डाइव्ह करणाऱ्याने खालील कागदपत्रे डाइव्ह सेंटरला सादर करणे आवश्यक आहे:

1. मान्यताप्राप्त एजन्सीकडून खुल्या पाण्यात डाइव्ह मारण्याचा परवाना.

2. खुल्या पाण्यात डाइव्हचा अनुभव प्रमाणित करणारे लॉग बुक.

3. “ही व्यक्ती स्कूबा डाइव्हसाठी योग्य आहे” असे नमूद करणारे वैद्यकीय प्रमाणपत्र.

4. डायव्हर नोंदणी फॉर्म पूर्ण केला असावा (जो डाइव्ह सेंटरमध्ये पूर्ण करता येतो).

## डायव्हिंग उपक्रमांवर देखरेख

1. सर्व डायव्हिंग प्रशिक्षण आणि प्रमाणपत्र  केवळ स्कूबा डायव्हिंग प्रशिक्षकाद्वारेच केले जावे. ते मानकानुसार सहाय्यक प्रशिक्षक किंवा डाइव्ह मास्टरची मदत घेऊ शकतात.
2. सर्व डाइव्ह प्रशिक्षक त्यांच्या डाइव्ह प्रशिक्षण एजन्सीबरोबर सक्रिय अध्यापन स्थितीत असणे आवश्यक आहे.
3. जर स्कूबा डायव्हर प्रमाणित असेल, पण गेल्या बारा महिन्यांत त्याने डाइव्ह मारल्याचा पुरावा दाखवता येत नसेल, तर त्याला 'आवश्यक स्कूबा डायव्हिंग कौशल्य' समाविष्ट असलेला रिफ्रेशर अभ्यासक्रम करणे आवश्यक आहे.
4. डाइव्ह मारण्याचे नियोजन करणे आवश्यक आहे - डाइव्ह सेंटर्सना नौका आणि डायव्हर्सच्या डाइव्ह योजनेमध्ये कोणत्याही बदलांची माहिती असणे आवश्यक आहे.
5. डाइव्ह प्रशिक्षक किंवा डाइव्ह मास्टर यांनी एका वेळी पाण्यात पाच पेक्षा जास्त डायव्हर्सना मार्गदर्शन करू नये.

### स्कूबा डायव्हिंगची प्राथमिक ओळख

1. प्रमाणित स्कूबा डायव्हर नसलेल्या व्यक्तीला 'डिस्कव्हर स्कूबा डाइव्ह' (डीएसडी) च्या माध्यमातून डायव्हिंग करता येते.
2. हे काम डाइव्ह प्रशिक्षक किंवा डाइव्ह मास्टरच्या उपस्थितीत करणे आवश्यक आहे.
3. सहभागी आणि प्रशिक्षक किंवा डीएमचे प्रमाण 1:1 असणे आवश्यक आहे; म्हणजे कोणत्याही वेळी, प्रशिक्षक किंवा डीएम डीएसडीदरम्यान एकापेक्षा अधिक डायव्हरला मार्गदर्शन करू शकत नाही.
4. डीएसडीसाठी जास्तीत जास्त परवानगी दिलेली खोली बारा मीटरपेक्षा जास्त असू नये.

## प्रतिबंधित क्षेत्रात स्नॉर्केलिंग

अंदमान आणि निकोबारच्या काही भागांमध्ये लष्कर, नौदल किंवा इतर सरकारी शाखांद्वारे गस्त घातली जाते किंवा नियंत्रण केले जाते .या ठिकाणी स्नॉर्केलिंग करता येत नाही. यासंबंधी मान्यवर संस्थांकडून माहिती घेणे आवश्यक आहे.

## सांस्कृतिक आणि पर्यावरण संरक्षण

i) समुद्रातून काहीही घेऊ नये आणि विशेषतः सांस्कृतिक स्मारके/ कलाकृती घेऊ नयेत.

ii)) सांस्कृतिक स्मारकांचे नुकसान करणे किंवा त्यातून काहीही काढण्याला बंदी आहे.
iii) स्नॉर्केलर्सनी सागरी पर्यावरणाचे आणि तेथील रहिवाशांचे संरक्षण केले पाहिजे. स्नॉर्केलर्सनी सागरी प्राण्यांना शारीरिक इजा करून त्रास देऊं नये. प्रवाळांचे संरक्षण करावे.शार्क माशांना कोणत्याही परिस्थितीत खायला  घालू नये
iv) सागरी संरक्षित क्षेत्रांसाठी (MPAs) आणि  संरक्षित प्रजातींना हानी पोचेल असे वर्तन करूं नये.

- सागरी संरक्षित क्षेत्रांमध्ये(MPAs) पोहण्यासाठी/ स्नॉर्केलला परवाने आवश्यक असू शकतात.ते परवाने पोहण्यापूर्वी मिळवलेले असावेत.

## दस्तऐवजीकरण

प्रत्येक डाइव्ह सेंटर/ऑफिसमध्ये प्रत्येक डायव्हरची नोंद असणे आवश्यक आहे, ज्यात खालील बाबी समाविष्ट असाव्या:

1. पूर्ण नाव आणि  संपर्क माहिती.

2. आपत्कालीन संपर्क माहिती.

3. त्यांनी केलेल्या डाइव्ह/कोर्सेसचा तपशील (कालावधी, खोली, इत्यादी).

4. ही सर्व माहिती डाइव्ह कंपनीने कमीत कमी 7 वर्षे ठेवणे आवश्यक आहे.

## जोखीम निवारण

1. डाइव्ह सेंटरच्या कर्मचाऱ्यांनी प्रत्येक डाइव्ह मारण्यापूर्वी डायव्हर्सना पूर्णपणे माहिती देणे आवश्यक आहे. थोडक्यात सुरक्षा नियम, खोली मर्यादा, डाइव्ह साइट ची वैशिष्ट्ये, प्रवाह, प्रवेश आणि बाहेर पडण्याचे तंत्र, पर्यावरणीय  विचार  आणि  संभाव्य धोके यांची माहिती समाविष्ट असली पाहिजे.

2. प्रत्येक डाइव्ह दरम्यान दर पाच मीटर नंतर कमीत कमी तीन मिनिटे सुरक्षेसाठी थांबणे आवश्यक आहे. डायव्हर्सनी सुरक्षा स्टॉप घेताना सिलेंडरचा दाब कमीत कमी ५० बार आहे ना ह्याची खात्री करावी.

3. डायव्हिंगच्या सर्व उपक्रमांसाठी बॉयन्सी कंट्रोल डिव्हाइसचा (बीसीडी) वापर पूर्णपणे अनिवार्य आहे.

DRAFT

4. डाइव्ह मास्टर किंवा डाइव्ह प्रशिक्षकाच्या अनुपस्थितीत कोणालाही एकट्याने डायव्हिंग करण्याची परवानगी नाही.

5. डाइव्ह सेंटर्सना स्थानिक हवामानाची जाणीव असणे आवश्यक आहे आणि डायव्हर्सना प्रत्येक डाइव्ह च्या ठिकाणी विशिष्ट परिस्थितीची माहिती देणे आवश्यकआहे.

6. या परिस्थितीत डायव्हिंग करण्यास बंदी आहे:

- 30 मीटरपेक्षा जास्त खोल डायव्हिंग करण्यास बंदी आहे.
- विमान प्रवासाच्या १२ तास आधी डायव्हिंग करण्यास बंदी आहे.

7. डायव्हर्सनी स्पष्टपणे आपल्या उपस्थितीची खूण करणे अत्यावश्यक आहे. उपक्रम आयोजित करणाऱ्या कोणत्याही नौकेत इतर नौकांना माहिती देण्यासाठी दिवस-रात्र झेंडे असणे आवश्यक आहे.

8. डायव्हर्स जिथे डाइव्ह करत आहेत तिथे डायव्हर्स पाण्यात असताना नेहमी डाइव्ह नौकांनी डाइव्ह झेंडे प्रदर्शित केले पाहिजेत. डाइव्ह झेंड्यांचा उपयोग आजूबाजूच्या बोटी, जेट स्की आणि आसपासच्या इतरांना संकेत देण्यासाठी केला जातो आणि त्यांनी सावध राहिले पाहिजे.

## आणीबाणी आणि बचाव

1. सर्व डाइव्ह सेंटर्समध्ये मध्ये वरती नमूद केल्याप्रमाणे आपत्कालीन कृती योजना असणे आवश्यक आहे.

2. सर्व डाइव्ह सेंटर कर्मचाऱ्यांना आपत्कालीन प्राणवायू उपकरणांची माहिती असणे आवश्यक आहे आणि सर्व कर्मचाऱ्यांसाठी दरवर्षी प्रशिक्षण सत्रे दिली पाहिजेत.

## सुरक्षा माहिती

1. सर्वसमावेशक डाइव्ह ब्रिफिंग व्यतिरिक्त, सर्व डायव्हरला सुरक्षा माहिती दिली पाहिजे, ज्यात बोटीवर आपत्कालीन आणि प्रथमोपचार उपकरणांच्या माहितीचा समावेश असावा. बोटीत चढल्यानंतर बोटीची सुरक्षा माहितीही देणे आवश्यक आहे.

2. ही माहिती डाइव्ह ब्रिफिंग व्यतिरिक्त केली पाहिजे.

## वैद्यकीय चिंता

DRAFT

1. “या व्यक्तीला स्कूबा डाइव्हमधे अडथळा येईल अशी कोणतीही वैद्यकीय स्थिती नाही.” असे नमूद करणारे वैद्यकीय प्रमाणपत्र.
2. स्कूबा डायव्हिंग सेंटरच्या प्रमाणपत्र एजन्सीने दिलेल्या वैद्यकीय निवेदनात या वैद्यकीय स्थितींची यादी असावी.

## ऑपरेटर्सना मंजुरी मिळण्यासाठी किमान मानके

1. डाइव्ह ऑपरेटरची स्थानिक पर्यटन विभागाकडे नोंदणी करावी.
2. डाइव्हिंग केंद्र एक किंवा अधिक आंतरराष्ट्रीय स्कूबा डायव्हिंग एजन्सीशी संलग्न असले पाहिजे.
3. डाइव्ह कर्मचाऱ्यांनी ज्या एजन्सीजशी डायव्ह सेंटर संलग्न आहे त्या संस्थांच्या आवश्यक पात्रता पूर्ण कराव्यात.
4. डाइव्ह सेंटरमध्ये कमाल क्षमतेनुसार उपकरणांचा संपूर्ण संच असला पाहिजे.
5. डाइव्ह सेंटरने आपल्या एजन्सीच्या सुरक्षा मानकांचे आणि आणि प्रमाणपत्रांच्या कागदपत्रांचे पालन केले पाहिजे.
6. डाइव्ह सेंटरमध्ये आपत्कालीन योजना असणे आवश्यक आहे ज्यासाठी डाइव्ह सेंटरच्या कर्मचाऱ्यांना वेळोवेळी नियमित प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.
7. डाइव्ह सेंटरने ‘कमीत कमी परिणाम” पद्धतीचे काटेकोरपणे पालन करावे.

**----------- दस्तऐवज समाप्त -------------**

DRAFT